# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूर शिक्षण केंद्र

(सत्र ३ : अभ्यासपत्रिका ४)

## जनाबाईचे अभंग व संपादनप्रक्रिया

(सत्र ४ : अभ्यासपत्रिका ६)

## तळ ढवळताना व संपादनप्रक्रिया

द्वितीय वर्ष : कला

मराठी : ऐच्छिक

(शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१४
बी.ए.भाग-२ (मराठी ऐच्छिक)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

☐ **प्रती : १,५००**

☐ **प्रकाशक :**
**डॉ. डी. व्ही. मुळे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

☐ **मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

☐ ISBN- 978-81-8486-538-7

★ दूर शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर ४१६ ००४ (महाराष्ट्र राज्य) (भारत)

★ दूर शिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

## दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ सल्लागार समिती ■


**प्रा. डॉ. एन. जे. पवार**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. पी. प्रकाश**
मा. कुलगुरू,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुक्त विद्यापीठ, हैद्राबाद

**प्रा. डॉ. के. एस. रंगाप्पा**
मा. कुलगुरू,
मानसगंगोत्री विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. डॉ. आर. कृष्णा कुमार**
मा. कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
ज्ञानगंगोत्री, गंगापूर डॅमजवळ, नाशिक

**मा. प्राचार्य डॉ. ए. एस. भोईटे**
प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. डॉ. सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २, ११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. अनिल गवळी**
अधिष्ठाता, कला व ललितकला विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील**
अधिष्ठाता, सामाजिक शास्त्रे विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे**
अधिष्ठाता, विज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. आर. जी. फडतरे**
अधिष्ठाता, वाणिज्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य डॉ. ए. बी. राजगे**
संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. डी. व्ही. मुळे**
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एम. ए. काकडे**
परीक्षा नियंत्रक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. डॉ. अरुण भोसले** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


### ■ अभ्यासमंडळ : मराठी ■


अध्यक्ष : **डॉ. अनिल पांडुरंग गवळी**
यशवंतराव चव्हाण कॉलेज, हलकर्णी, ता. चंदगड, जि. कोल्हापूर

- **प्रा. डॉ. राजन गवस**
  प्रमुख, मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. एकनाथ बाबुराव आळवेकर**
  दत्ताजीराव कदम आर्टस, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज,
  इचलकरंजी, जि. कोल्हापूर
- **डॉ. सुनील वामन चंदनशिवे**
  राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, सदर बझार,
  कदमवाडी रोड कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती सुमन कृष्णाजी चव्हाण**
  विश्वासराव नाईक महाविद्यालय, शिराळा, जि. सांगली
- **डॉ. शिवाजी महादेव होडगे**
  सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड,
  ता. कागल, जि. कोल्हापूर
- **डॉ. संजय दशरथ पाटील**
  दूधसाखर महाविद्यालय, बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर
- **डॉ. प्रकाश कुंभार**
  नाईट कॉलेज ऑफ आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स, कोल्हापूर
- **डॉ. बळवंत तुरंबेकर**
  डी. आर. माने महाविद्यालय, कागल

| **अभ्यास घटकांचे लेखक : सत्र तिसरे<br>जनाबाईचे अभंग व संपादनप्रक्रिया** | |
|---|---|
| **लेखक** | **घटक शीर्षक** |
| **डॉ. सुजय पाटील**<br>सहाय्यक प्राध्यापक, कमला कॉलेज, कोल्हापूर | १. जनाबाई आणि विठ्ठल<br>२. क्षणचित्रे, भारुड व काकड आरती |
| **डॉ. ब. ना. तुरंबेकर**<br>प्रमुख, मराठी विभाग, डी.आर.माने महाविद्यालय, कागल | ३. जनाबाईंची उपदेशवाणी |
| **डॉ. शिवाजी विष्णू पाटील**<br>प्रमुख, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग,<br>बळवंत कॉलेज, विटा, ता. खानापूर, जि. सांगली | ४. संपादनप्रक्रिया<br>(संपादनाचे स्वरूप, संपादकाचे गुण व पूर्वतयारी) |
| **सत्र चौथे<br>तळ ढवळताना व संपादनप्रक्रिया** | |
| **डॉ. माधवी देसाई**<br>शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज | १. तळ ढवळताना : आशयसूत्रे |
| **डॉ. अरुण कृष्णा शिंदे**<br>नाईट कॉलेज ऑफ आर्टस अॅण्ड सायन्स, कोल्हापूर | २. तळ ढवळताना : सामाजिक कविता |
| **डॉ. संपतराव रामचंद्र पार्लेकर**<br>कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, पलूस | ३. तळ ढवळताना : अभिव्यक्ती |
| **डॉ. शिवाजी विष्णू पाटील**<br>प्रमुख, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग,<br>बळवंत कॉलेज, विटा, ता. खानापूर, जि. सांगली | ४. संपादनप्रक्रिया<br>(संपादनाची विविधता, ग्रंथ-मासिक-अहवालाचे संपादन) |

■ **संपादक** ■

**डॉ. ब. ना. तुरंबेकर**
प्रमुख मराठी विभाग,
डी. आर. माने महाविद्यालय, कागल

**डॉ. अनिल गवळी**
अधिष्ठाता, कला व ललितकला विद्याशाखा,
अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प्रास्ताविक

विद्यार्थी मित्र हो,

बी. ए. भाग २ साठी मराठी या विषयाला पहिल्या सत्रात 'जनाबाईचे अभंग' व संपादनप्रक्रियेतील संपादनाचे स्वरूप व संपादकाचे गुण-पूर्वतयारी हे घटक अभ्यासाला आहेत. दुसऱ्या सत्रात लहू कानडे यांचा 'तळ ढवळताना' हा काव्यसंग्रह आणि संपादनप्रक्रियेतील संपादनाची विविधता व ग्रंथ, मासिक, अहवाल यांचे संपादन हे घटक अभ्यासाला आहेत. बी. ए. चे हे अनुक्रमे तिसरे व चौथे सत्र आहे.

जनाबाईचे अभंग मराठी वाङ्मयात महत्त्वाचे मानले जातात. यादवकाळातील विशिष्ट समाजरचना असणाऱ्या कालखंडात जनाबाई येते. नामदेवाची दासी अशीही तिची नाममुद्रा आहे. जनाबाईचे अवघे साडेतीनशेच्या आसपासच अभंग आहेत. मात्र या अभंगांतून जनाबाईचे एक व्यक्तिमत्त्व आपल्या नजरेसमोर उभे राहते. जनाबाई आणि विठ्ठलाचे नाते, जनाबाई आणि नामदेवाचे भावबंध, जनाबाई आणि ज्ञानदेव, जनाबाईची उपदेशवाणी, तिने लिहिलेले भारुड, काकडआरती असे इतर काव्य अशा घटकांवर तिच्या अभंगातून प्रकाश पडतो. या साऱ्यातून जनाबाईचे मानस व्यक्त होते. मध्ययुगीन काळ हा तसा संतवाङ्मयाचा आणि विठ्ठलभक्तीचा काळ आहे. संतांचे विठ्ठलाशी असणारे सख्य पाहिल्यानंतर आपण थक्क होतो. तुकारामांनी तर मध्ययुगात आपल्या अभंगाद्वारे भक्तीची एक ठाम मुद्रा जनसमाजावर उमटविली आहे. विठ्ठलाचा भक्त, विठ्ठलभेटीसाठी तळमळणारा एक साधक व सिद्ध भक्त अशी तुकारामांच्या पारमार्थिक वाटचालीची मांडणी आपणास त्यांच्या अभंगाद्वारे करता येते. जनाबाईची पारमार्थिक वाटचालही आपणास रेखाटता येते. जनाबाई विठ्ठलभेटीसाठी व्याकुळ होते. तळमळते. विठ्ठल भेटत नाही, म्हणून त्याला प्रसंगी शिव्या घालते. याबाबतीत जनाबाईचे नाते थेट नामदेव व तुकारामांशी जोडता येते. जनाबाई व विठ्ठल यांचे नाते गेले कित्येक वर्षे, कित्येक शतके मराठी मनाला मोह घालत आहे. अत्यंत रमणीय, मोहक आणि अतूट असे हे नाते आहे. मराठी वाचकांना, रसिकांना या नात्याची भूल गेली कित्येक वर्षे पडलेली आहे. विठ्ठल हा जनाबाईचा मित्र, सखा, सहकारी, कामातील वाटेकरी, आप्त, नातेवाईक, स्वकीय सर्वकाही आहे. ती विठ्ठलाला शिव्या देते, त्याला हाका घालते, त्याची सोबत करते, त्याच्या नावाने वावरते. या करिता मूळ अभंगच पाहणे उत्तम! जनाबाईची उपदेशवाणी तितकीच तिखट आहे. नामस्मरण, भक्ती, संत व सज्जनांची संगत अशा बाबींचा उपदेश करताना मोजक्या शब्दात ती बोलते. वैष्णव कोण आणि सोंगी

कोण याची चर्चा ती करताना दिसते. उपदेश करताना जनाबाई अजामेळ राजा, विदूर, गणिका याची उदाहरणे देते. पंढरी व नाममाहात्म्य कथन करते. सत्कर्माचे महत्त्व सांगते. या साऱ्याचे विवेचन या पुस्तकात येते. 'स्त्रीजन्म म्हणवुनि न व्हावे उदास' हे जनाबाईचे बोल अत्यंत आत्मविश्वासाचे आहेत. त्यातून तत्कालीन स्त्रियांना निश्चितच उर्जा मिळाली असेल.

'तळ ढवळताना'मधील कविता या समकालीन कविता आहेत. त्या महानगरीय संवेदन मांडतातच तद्वतच ग्रामीण जीवन, आदिवासी जीवन मांडतात. हागणदारीमुक्त, बालवाडी अशा योजनांची झालेली गल्लत मांडतात. जागतिकीकरणाचा परिणाम व्यक्त करतात. सातपुडा या पर्वताची होणारी लूट व कत्तल व्यक्त करतात. पर्यावरणीय संवेदन, आदिवासी व ग्रामीण व्यक्तींबद्दलचा कळवळा त्यातून व्यक्त होतो. लहू कानडेच्या या कविता खरोखरच आपल्या मनाचाही तळ ढवळून काढतात. शेवटी संपादनप्रक्रिया हा घटक दोन्ही सत्रात विभागला गेला आहे. त्याचे चार उपघटक आहेत. प्रत्येक सत्रात दोन उपघटक येतात. संपादनप्रक्रिया हा भाग पुस्तकी ज्ञानापेक्षा प्रत्यक्ष ज्ञानाचाच अधिक आहे. व्यावहारिक ज्ञान त्यातून प्राप्त होईल. आपणा सर्वांना शुभेच्छा!

**संपादक**

**डॉ. ब. ना. तुरंबेकर**
प्रमुख मराठी विभाग,
डी. आर. माने महाविद्यालय, कागल

**डॉ. अनिल गवळी**
अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ,
कला व ललितकला अधिष्ठाता,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| तृतीयसत्र : अभ्यासपत्रिका क्रमांक ४ | पृ.क्र. |
|---|---|
| घटक १ जनाबाई आणि विठ्ठल | १ |
| घटक २ जनाबाईचे अभंग : क्षणचित्रे, भारूड व काकड आरती | १३ |
| घटक ३ जनाबाईंची उपदेशवाणी | २४ |
| घटक ४ संपादनप्रक्रिया | ३४ |

| चतुर्थसत्र : अभ्यासपत्रिका कम्रांक ६ | पृ.क्र. |
|---|---|
| घटक १ तळ ढवळताना : आशयसूत्रे | ४९ |
| घटक २ तळ ढवळताना : सामाजिक कविता | ७७ |
| घटक ३ तळ ढवळताना : अभिव्यक्ती | ९३ |
| घटक ४ संपादनप्रक्रिया | १०८ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१४-१५ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# सत्र ३ : घटक १

# जनाबाई आणि विठ्ठल

## १.१ उद्दिष्टे

या घटकाचे वाचन केल्यानंतर आपणास पुढील गोष्टी समजून येतील.

- संत जनाबाईंचा परिचय होईल.
- संत जनाबाईंच्या अभंगरचनेचा परिचय होईल.
- जनाबाई आणि विठ्ठल यांच्या नातेसंबंधातील उत्कटतेचा परिचय होईल.
- संत जनाबाईंच्या पारमार्थिक वाटचालीचा परिचय होईल.

## १.२ प्रास्ताविक

महानुभाव संप्रदाय, वारकरी संप्रदाय यांच्या समाजशील अशा जाणिवेतून संतकवयित्रींची मांदियाळी उदयास आली. मध्ययुगीन मराठी साहित्यामध्ये या संतकवयित्रींचे स्थान अनन्यसाधारण असे आहे. महदाईसा, मुक्ताबाई, जनाबाई, निर्मळा, कान्होपात्रा, सोयराबाई, बहिणाबाई, वेणाबाई या संतकवयित्रींनी विपुल अशी काव्यरचना केली. सांसारिक जबाबदारी सांभाळत त्यांनी केलेल्या रचना जितक्या प्रासादिक, तितक्याच उत्कट, अंतर्मुख अशा आहेत. समाजमनावर सात्त्विकतेचे संस्कार करून, समाजउद्धार करण्याची तळमळ त्यांच्या रचनेतून अखंड प्रवाहित होताना आपणास दिसते. यामध्ये स्वतःचे दासीपण सांभाळत आध्यात्मिकदृष्ट्या आपल्या आयुष्याचे सार्थक करणारी संत जनाबाई आणि तिची अभंगरचना वेधवती अशी आहे.

प्रस्तुत 'जनाबाईचे अभंग' या पुस्तकात जनाबाई आणि विठ्ठल, क्षणचित्रे, उपदेशवाणी भारुड, काकड आरती असे विभाग आहेत. यामधून संत जनाबाईंची गृहिणी, भक्त, साधक आणि सिद्ध अशी चरित्ररेखा आपल्यासमोर उभी राहते.

## १.३ कवयित्री परिचय

'संत वाटिकेतील जाईची वेल' म्हणून गौरविण्यात आलेल्या जनाबाईंच्या चरित्राची रेखा अत्यंत अलौकिक आणि भावमधुर अशी आहे.

मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यातील, गोदावरी काठचे 'गंगाखेड' हे तिचे गाव. तिच्या वडिलांचे नाव 'दमा' व आईचे नाव करूंड असे होते. हे दांम्पत्य भगवद्‌भक्त होते. संतानप्राप्तीसाठी त्यांनी विठ्ठलाला नवस केला होता. या नवसामुळेच जनाबाईचा जन्म झाला आहे अशी धारणा होती. पुढे

विठ्ठलाच्या स्वप्न दृष्टांतानुसार या दांम्पत्याने जनाबाईला पंढरपुरातील दामा शेटी (दामा शिंपी) यांच्या घरी अर्पण केले. कालांतराने दमा आणि करूंड यांना देवाज्ञा झाली. दामा शेटच्या कुटुंबात जनाबाई लहानाची मोठी झाली.

दामाशेटचा मुलगा नामदेव याला बालपणापासूनच जनाबाईने अंगाखांद्यावर खेळविले. वाढविले. 'कली'त नामदेव विठ्ठल चिंतनी। त्याचीच सेवेलागी जन्मली जनी।।' अशा शब्दांत नामदेवाच्या सेवेसाठी आपला जन्म झालेला आहे असे जनाबाई अभिमानाने सांगतांना दिसते.

नामदेवाच्या सहवासात विठ्ठल भक्तीचे संस्कार जनाबाईंवर झाले. नामदेवाघरची सर्व कामे करीत जनाबाईने विठ्ठलभक्तीची पूजा आरंभीली. विठ्ठलाविषयीचा भक्तिभाव व्यक्त करणारी अभंगरचना तिने केली. 'नामयाची जनी' ही नाममुद्रा धारण करून तिने साडेतीनशे अभंगांची रचना केलेली आढळते.

आध्यात्मिक जडणघडणीचा आलेख मांडणाऱ्या या अभंगात जनाबाईंच्या जन्म व मृत्यू तिथी संदर्भात मात्र कुठेच दाखले मिळत नाहीत. या बाबतीत मात्र जनाबाईंचे चरित्र संदिग्धच राहिलेले दिसते.

## १.४ विषय विवेचन

सश्रद्ध मातापित्याच्या पोटी जनाबाईचा जन्म झाला. त्यांच्या निर्वाणानंतर जनाबाईचे पालनपोषण पंढरी नगरीत नामदेवांच्या घरी झाले. तेथील भक्तिपूर्ण वातावरणाचा जनाबाईवर परिणाम न झाला तर नवलच ! न कळतच जनाबाईला विठ्ठलभक्तीची ओढ लागते. 'साधक-उपासक-सिद्ध-मुक्त-साक्षात्कारी जनी' असा तिचा आध्यात्मिक वाटेवरचा प्रवास पूर्ण होतो.

या प्रवासातील जनाबाई आणि विठ्ठल यांच्यातील विविध पातळीवरील नातेसंबंध आपल्याला पाहावयास मिळतात. यामध्ये विठ्ठल भेटीविषयी व्याकूळ, आर्त झालेली जनाबाई, विठ्ठलाच्या नामस्मरणाचे महत्त्व सांगणारी जनाबाई, साक्षात विठ्ठलमय झालेली जनाबाई अशा विविध भावावस्था तिच्या अभंगांमधून आपल्याला दिसतात. यामधून जनाबाई आणि विठ्ठल यांच्यातील अनोख्या नातेसंबंधाचा प्रत्यय आपल्याला येतो. तो आपल्याला पुढीलप्रमाणे अभ्यासावयाचा आहे.

### १.४.१ विठ्ठलाच्या भेटीसाठी व्याकुळलेली जनाबाई

वारकरी संप्रदायाच्या सर्व संतांच्या रचनेत विठ्ठलाच्या भेटीचा, ओढीचा एक समान धागा आढळतो. त्याचा कृपाघात आपल्यावर कोसळावा आणि आयुष्याचे सार्थक व्हावे ही प्रत्येक संताची धारणा असलेली आपणास दिसते. त्यामुळेच आपल्या अभंगरचनांच्यामधून विठ्ठलाला त्यांनी घातलेली साद आपणास दिसून येते. जनाबाईही त्याला अपवाद नाही.

ज्याने आपल्या भक्तिभावाने प्रत्यक्ष पांडुरंगाला वश करून घेतले त्या नामदेवाच्या द्वारी आपली जन्मोजन्मी सेवा घडावी; त्यासाठी भविष्यात आपला कोणत्याही पशुपक्ष्याच्या पोटी जन्म झाला तरी चालेल असं जनाबाई पांडुरंगाकडे मागणं मागते. नामदेवाची सेवा करणे म्हणजे प्रत्यक्ष पांडुरंगाला वश

करून घेणे होय. हे भक्तिमार्गातील सोप गणित जनाबाईला माहीत आहे. त्यामुळेच ती पांडुरंगाची विनवणी करताना म्हणते;

''देवा देई गर्भवास। तरीच पुरेल माझी आस।।
परि हे देखा रे पंढरी। सेवा नामयाचे द्वारी।।
करीं पक्षि कां सुकर। श्वान श्वापद मार्जार।।
ऐसा हेत माझे मनीं। म्हणे नामयाचे जनी।।''

आपलं कौटुंबिक पोरकंपण जनाबाईला सदैव छळत होतं. आपल्या या पोरकेपणात फक्त पांडुरंगाचाच आधार आहे. त्याच्यामुळेच आपला उद्धार होणार आहे. याची जाणीव जनाबाईला आहे. त्यामुळेच 'आई मेली बाप मेला। मज सांभाळी विठ्ठला'

किंवा

''काय करूं पंढरीनाथा। काळ साह्य नाही आता।।
मज टाकिलें परदेशीं। नारा विठा तुजपाशीं।।
श्रम बहु जाला जीवा। आता सांभाळी केशवा।।
कोण सखा तुजविण। माझें करी समाधान।।
हीन दीन तुझे पोटी। जनी म्हणे द्यावी भेटी।''

अशी आर्तसाद ती पंढरीनाथाला घालतांना दिसते.

विठ्ठल हा आपला तारक आहे. आपल्या सर्व इच्छा पूर्ण करणारा आहे, अशी जनाबाईची आर्त धारणा आहे. पण तिच्या या आर्ततेला काही वेळा साशंकता घेरतांना दिसते. ज्या विठ्ठलावर आपण विसंबून आहोत, त्यानेच जर आपल्याला 'अव्हेरले' तर काय करावे, असा प्रश्न तिच्यापुढे उभा राहतो. अशावेळी मोठ्या कौशल्याने विठ्ठलाला त्याच्या 'उद्धारक'वृत्तीची जाणीव ती करून देते. सागराने नदीला, आईने मुलाला, जळाने जलचरांना अव्हेरलं तर हा कमीपणा सागर, आई आणि पाण्याला येईल. तद्वत आमचे रक्षण तू केले नाही तर शरण आलेल्या भक्तांचा तू 'उद्धारकर्ता' आहेस या ब्रीदाला धक्का पोहचेल. त्यामुळे तू माझ्या हाकेला धावला पाहिजेस असे ती म्हणते. इथे जनाबाईची जशी आर्तता दिसते तशाच प्रकारे चातुर्य व भाविकताही दिसते, पाहा.

''गंगा गेली सिंधूपाशी। तेणें अव्हरिलें तिसीं।।
तरी सांगावे कवणाला। ऐसें बोलें बा विठ्ठला।।
जळ कोपे जळचरा। माता अव्हेरी लेंकुरा।।
जनी म्हणे शरण आलें। अव्हेरितां ब्रीद गेलें।।''

अनेक प्रकारे जनाबाई पांडुरंगाची करुणा भाकते. भीमा, चंद्रभागा हे पांडुरंगाचे वैभव आहे. या वैभवासहित

त्याने यावे आणि आपला उद्धार करावा अशी इच्छा व्यक्त करून अत्यंत लडिवाळपणे ती त्याला 'विठाबाई', 'पंढरीचे आई' अशा कुटुंबवत्सल शब्दात साद घालते, पहा.

''येग येग विठाबाई। माझे पंढरीचे आई।।
भीमा आणि चंद्रभागा। तुझे चरणींच्या गंगा।।
इतुक्यासहित त्वां बा यावें। माझे रंगणी नाचावें।।
माझा रंग तुझिया गुणी। म्हणे नामयाची जनी।।''

जनाबाईच्या आर्ततेला, व्याकुळतेला संतापाचीही किनार आहे. अनेकप्रकारे विनवणी करूनही विठ्ठल धाव घेत नाही हे लक्षात आल्यावर ती संतापते. कठोर शब्दात त्याची हजेरी घेते. पण त्याचबरोबर विठ्ठलाला पाहून 'काळ रडतो' अशा शब्दात त्याचे कालातीत व्यापकपण ती सूचित करते, त्याच्या भक्तवत्सलपणाला आवाहन करते, पाहा.

''अरे विठ्या विठ्या। मूळ मायेच्या कारट्या।।
तुझी रांड रंडकी जाली। जन्मसावित्री चुडा ल्याली।।
तुझें गेलें मढे। तुला पाहून काळ रडे।।
उभी राहूनि अंगणी। शिव्या देत दासी जनी।।

### १.४.२ विठ्ठलाच्या नामस्मरणाचे महत्त्व

नवविधा भक्तीमध्ये 'नामस्मरण' भक्तीला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. त्या नामस्मरणाचे महत्त्व इतर संतांप्रमाणेच जनाईनेही ओळखले होते. त्यामुळेच 'विठ्ठलाचे नाम तारक हे थोर' असा विश्वास ती व्यक्त करते. विठ्ठलाच्या नामस्मरणामुळे 'चोखामेळा', 'अजामेळ' उद्धारले असे जनाबाई सांगते. विठ्ठलाच्या नामस्मरणाचा महिमा इतका मोठा आहे की, आपल्या जीवनातील प्रत्येक पाऊल पुढे टाकण्याआधी त्याचे नामस्मरण करावे. त्यामुळे आपला उद्धार होईल असे तिला वाटते. नामस्मरणासाठी कोणत्याही दैनंदिन कर्मांचा त्याग करावा लागत नाही. आपल्या नित्यनैमित्तिक कर्माबरोबर नामस्मरण सहजच घडते असा दाखला स्वतःच्या आचरणातून तिने दिला आहे.

''नाम विठोबाचे घ्यावे। मग पाऊल टाकावे।।
नाम तारक हे थोर। नामे तारिले अपार।।
अजामेळ उद्धरिला। चोखामेळा मुक्तीस नेला।।
नाम दळणीं कांडणी। म्हणे नामयाची जनी।।''

जनाबाईचे सांगणे आहे की, प्रत्येकाने प्रसन्न चित्ताने 'हरिकथेस' सादर व्हावे. हरिकथेमुळे चौऱ्याऐंशी लक्ष योनीचा फेरा चुकतो. जीवनातील अनंत अडचणी नाहीशा होतात. त्यामुळे आळस, निद्रा त्यागून हरिकथेत तल्लीन व्हावे; अशी इच्छा जनाबाई व्यक्त करते, पाहा.

''व्हावं कथेसी सादर। मन करूनिया स्थिर।।
बाबा काय झोपी जातां। झोके चौरासीचे खातां।।
नरदेह कैसा रे मागुता। भेटी नव्हे त्या सीताकांता।।
आळस निद्रा उठाउठी। त्यजा स्वरूपी घाला मिठी।।
जनी म्हणे हरिचे नाम। मुखी म्हणा धरूनि प्रेम।।''

उच्च, नीच, स्त्री, पुरुष हा भेदभाव नामस्मरणाच्या आड येऊ शकत नाही. असा महत्त्वपूर्ण विचार जनाबाई देते. त्यामुळेच अशा भेदभावाची आडकाठी करणाऱ्यांना 'मनगटावर तेल घाला तुम्ही' असा खणखणीत इशारा ती देतांना दिसते. विठ्ठलाशी एकरूप होताना तिला व्यावहारिक बंधनांची पर्वा नाही. लोक काय म्हणतात इकडे लक्ष न देता आपण विठ्ठलाचा मार्ग धरला आहे; आता लोकव्यवहाराची आपल्याला पर्वा नाही; असा भाव तिच्या पुढील अभंगातून व्यक्त होतो.

''डोईचा पदर आला खांद्यावरी। भरल्या बाजारी जाईन मी।।
हाती घेऊन टाळ खांद्यावरी वीणा। आतां मज मना कोण करी।।
पंढरिच्या पेठे मांडियेलें पाल। मनगटावर तेल घाला तुम्ही।।
जनी म्हणे देवा मी जाले वेसवा। रिघालें केशवा घर तुझे।।''

विठ्ठल सर्वव्यापी आहे. त्याचं व्यापकपण इतकं सामर्थ्यशाली आहे की, त्याच्यासमोर 'काळही रडतो'. अशा सामर्थ्यशाली विठ्ठलाला नामस्मरणामुळेच आपण वश करून घेऊ शकतो; असा विश्वास जनाबाई व्यक्त करते. सततच्या नामस्मरणाने आपण विठ्ठलाला हृदयात कोंडले आहे. सोऽहंभावाने त्याचे स्मरण करून त्याला कायमचे आपलेसे केले आहे. तो आता कोठेही जाऊ शकत नाही. त्या विठ्ठलाशी एकरूप झाल्याशिवाय मी त्याला सोडणारच नाही असा निर्धार तिने व्यक्त केला आहे.

''धरिला पंढरीचा चोर। गळां बांधोनिया दोर।।
हृदय बंदिखाना केला। आंत विठ्ठल कोंडिला।।
शब्दें केली जडांजुडी। विठ्ठल पायीं घातली बेडी।।
सोहं शब्दाचा मारा केला। विठ्ठल काकुळती आला।।
जनी म्हणे बा विठ्ठला। जीवें न सोडी मी तुला।।''

सर्वत्र सर्वव्यापी असणारा विठ्ठल त्याला आपण आपल्या हृदयात बंदिस्त करून ठेवले; त्याची आता आपल्यापासून सुटका नाही. विठ्ठलाच्या या भेटीतील तृप्ततेचा अनुभव इतरांनीही घ्यावा. त्याला आपल्याकडे ठेऊन घेण्याची 'सोऽहं' शब्दाच्या नामस्मरणाची युक्ती ती सांगते;

''सोऽहं शब्दाचा मारा केला। विठ्ठल काकुळतीला आला।।
जनी म्हणे बा विठ्ठला। जीवे न सोडी मी तुला।।''

जनाबाईने आपल्या विठ्ठल भेटीतील तृप्ततेचा आनंद फक्त स्वतः जवळ न ठेवता तो सर्वांना वाटला आहे. विठ्ठलाच्या भेटीची युक्ती इतरांनाही समजावून दिलेली आहे. यामधून जनाबाईच्या संतत्वातील मोठेपण आपल्याला दिसून येते.

**विठ्ठल भेटीची तृप्तता :** विठ्ठलाच्या भेटीची ओढ हा संतांचा स्थायीभाव आहे. या परब्रह्माच्या भेटीसाठीचा त्यांचा अट्टाहास अलौकिक असा असतो. त्याच्या भेटीमुळे 'आपले मीपण संपते' व आपण 'त्याच्याशी एकरूप होतो' ही संतांची धारणा आहे. विठ्ठलाच्या भेटीतील तृप्ततेचा अनुभव जनाईने घेतला होता. 'मायबाप' नामदेवामुळेच आपली आणि विठ्ठलाची भेट झाली असे कृतज्ञतापूर्वक जनाबाई सांगते. विठ्ठलाच्या भेटीमुळे आपल्या देहाचा पालट झाला. मीठ आणि पाणी एकत्र आल्यावर ते जसे एकरूप होऊन जाते तद्‌वतच विठ्ठल आणि भक्त यांची भेट झाली की त्यांच्यात द्वैत राहतच नाही. चित्तीच्या आशाआकांक्षा त्याच्यापायी शांत होतात. असा आपल्या विठ्ठलाच्या भेटीतील तृप्ततेचा आत्मानुभव जनाबाई व्यक्त करताना दिसते.

''देहाचा पालट विठोबाचे भेटी। जळ लवणा गांठी पडोन ठेली।।
धन्य मायबाप नामदेव माझा। तेणे पंढरीराजा दाखविले।।
रात्रंदिवस भाव विठ्ठलाचे पायीं। चित्त ठायीचे ठायी मावळले।।
नामयाचे जनी आनंद पै जाला। भेटावया आला पांडुरंग।।''

**विठ्ठल : भक्तांचा पाठिराखा** : संतसज्जनाचे सर्व व्यवहार हे परमेश्वराला साक्षी ठेऊनच होत असतात. अनंत अडचणींच्यामध्ये तोच एक आपला सहाय्यकर्ता आहे अशी त्यांची धारणा असते. सज्जनांच्या वर्तन-व्यवहाराच्यामध्ये विठ्ठल सदैव त्यांच्या अवतीभोवती राहतो. आपल्या भक्तांच्याकडे सदैव सूक्ष्म आणि परिपूर्ण लक्ष ठेऊन त्यांना सांभाळून घेतो हे पटवून देण्यासाठी जनाबाई घार, वानर या पशुपक्षांचे तसेच द्रौपदी, गोरा कुंभार, कबीर यांच्या चरित्रांचे मार्मिकपणे दाखले देते, पाहा.

(१)

पक्षी जाय दिगंतरा। बाळकांसी आणी चारा।।
घार हिंडते आकाशी। झेप घाली पिल्लांपासीं।।
माता गुंतली कामासी। चित्त तिचें बाळापाशीं।।
वानर हिंडे झाडावरी। पिलीं बांधुनी उदरी।।
तैसी आम्हांसी विठ्ठल माये। जनी वेळोवेळां पाहे।।

(२)

द्रौपदीकरण। पाठीराखा नारायण।।
गोरा कुंभाराच्या संगे। चिखल तुडवूं लागे अंगे।।

कबीराच्या बैसोनी पाठी। शेला विणितां सांगे गोष्टी।।
चोख्यामेळ्यासाठी। ढोरे ओढी जगजेठी।।
जनीसंगे दळूं लागे। सुखर म्हणती धन्य भाग्ये।।

आपल्या भक्ताच्या क्षेमकुशलासाठी विठ्ठल सर्वांना ओलांडून आपल्या भक्ताकडे येतो, याचा दाखला देण्यासाठी जनाबाई आपल्या चरित्राची साक्ष देते. तो प्रसंग असा; नामदेवांच्या घरी विठ्ठल येतात. पायी लागणाऱ्या सर्वांना ते आशीर्वाद देतात. जनाबाई कोठे दिसत नाही हे लक्षात आल्यावर विठ्ठल तिला शोधित शोधित ती ज्या ठिकाणी घरकामात गुंतलेली असते तिथे जाऊन मोठ्या कौतुकाने तिचे क्षेमकुशल ते विचारतात. या गोड कौटुंबिक कथेच्या माध्यमातून जनाबाई परमेश्वर भक्तांचा पाठिराखा कसा असतो हे सांगते, पाहा.

''एके दिवशी वाडियांत। देव आले अवचित।।
अवघीं पायांस लागली। देवें त्यावरी कृपा केली।।
बाहेर कामासी गुंतल्ये। देवें मजला विचारिले।।
बाहेर आहेस वो बोलती। देव मजला हाटकिती।।
हात धुऊनि जवळ गेल्यें। कोठे गे जनी हांसून बोले।।

**विठ्ठलमय झालेली जनाबाई**

जनाबाईला आपल्या पोरकेपणाची पूर्ण जाणीव होती. या पोरकेपणाची पोकळी नामदेवाघरची सेवा करीत पांडुरंगाच्या भक्तीने भरून काढावी या विचाराने ती नेहमी विठ्ठलभक्तीने आत्ममग्न होते.

सामाजिक परंपरेच्या चौकटीनुसार 'स्त्री' म्हणनू जी कामे करावी लागतात ती सर्व कामे जनाबाई नामदेवाच्या घरी करीत असे. ही कामे करीत असताना 'सोऽहंम' शब्दाच्या माऱ्याने ती विठ्ठलाला आपलासा करून घेते. विठ्ठल आपल्याबरोबर आहे या जाणीवेतून तिचे सर्व व्यवहार होत राहतात. या सर्व व्यवहारांना देवस्वरूप येते. पाहा;

''देव खाते देव पिते। देवावरी मी निजते।।
देव देते देव घेते। देवासवे व्यवहारिते।।
देव येथे देव तेथे। देवाविणें नाही रितें।।
जनी म्हणे विठाबाई। भरुनि उरलें अंतरबाही।।

आपला भोळाभाबडा भक्तिभाव, स्नेहशील-प्रेमळ स्वभाव, कष्टाळूवृत्ती यामुळे जनाबाईने विठ्ठलाला जिंकून घेतले आहे. त्यामुळेच गाईला वैरण घालणे, झाडलोट करणे, पाणी भरणे, काखेत धुणे घेऊन जाणे, गोवऱ्या वेचणे, लाकडाची मोळी तयार करणे इ. कामात प्रत्यक्ष विठ्ठल तिला मदत करताना दिसतो.

विठ्ठलमय वातावरणामुळे त्याच्याशी एकरूप झालेली जनाबाई आपलं सुखदुःख त्याला सांगते.

विठ्ठलाला मातृस्थानी पाहते. विठ्ठल देखील आपल्या मातृभावाला जागून जनाबाईची वेणीफणी करतो, तिच्या आंघोळीच्या पाण्यात विसण घालतो. विठ्ठलाचा मातृस्नेहभाव जनाबाईच्या दृष्टीने अभिमानाचा विषय होतो. त्यामुळेच ती हा भाव आपल्या अभंगातून जागोजागी व्यक्त करते. पाहा.

‘‘झाडलोट करी जनी। केर भरी चक्रपाणि।।
पाटी घेऊनी डोईवरी। नेऊनियां टाकी दुरी।।
ऐसा भक्तीसी भुलला। नीच कामें करू लागला।।
जनी म्हणे बा विठ्ठला। काय उतराई होऊ तुला।।

‘‘एके दिवशी न्हावयास। पाणी नव्हते विसणास।।
देव धांवोनिया आले। शीतल उदक घे घे बोले।।
आपुल्या हातें विसणी। घाली जनीच्या डोयीं पाणी।।
माझ्या डोईच्या केसांस। न्हाणे नव्हते फार दिवस।।
तेणे मुरडी केशांस। कां म्हणे उगीच बैस।।
आपुल्या हातें वेणी घाली। जनी म्हणे माय आली।।

‘‘तुळशीचे वनी। जनी उकलीत वेणी।।
हाती घेऊनिया लोणी। डोई चोळी चक्रपाणी।।
माझे जनीला नाही कोणी। म्हणून देव घाली पाणी।।
जनी सांगे सर्व लोकां। न्हाऊं घाली माझा सखा।।

‘‘धुणें घेऊनि कांखेसी। जनी गेली उपवासी।।
मागे विठ्ठल धांवला। म्हणे का टाकिले मला।
धाऊनी देवा कां आलासी। म्हणें नामयाची दासी।।

‘‘राना गेली शेणीसाठी। वेचं लागे विठो पाठी।।
पितांबर ओचे खोंवी। पायी शोभा पारखावी।।
पूर्ण भरोनिया मोट। जनी म्हणे द्यावी गांठ।।

‘‘साळी कांडायास काढी। चक्रपाणि उखळ झाडी।।
कांडितां कांडितां। शीण आला पंढरिनाथा।।

कांडिताना घाम आला। तेणें पितांबर भिजला।।
पायी पैंजण हाती कडीं। कोंडा पाखडोनि काढी।।
हाता आला असे फोड। जनी म्हणे मुसळ सोड।।

आपल्या निखळ, निरपेक्ष भक्तीच्या जोरावर विठ्ठलाला जनाबाईने आपलंसं केलं. विठ्ठलाने देखील 'माझे जनीला नाही कोणी' असं म्हणत या पोरक्या मुलीला जवळ केलं. तिला उदंड प्रेम दिलं. 'देव भावाचा भुकेला' या ब्रीदाची जणू त्यानं साक्ष दिलेली आपणास दिसते.

## १.५ शब्दार्थ व टिपा

- **तारक** – तारणारे, उद्धार करणारे
- **सोहळा** – समारंभ
- **मोट** – मोळी
- **बंदिखाना** – तुरुंग
- **जवाजुडी** – जवा (मिलाफ किंवा मेळ) + जुडी (जूट किंवा जोडणी)
- **सोऽहम्** – स: अहम्। तो मी आहे, म्हणजे मीच परब्रह्म आहे, असा जीवाला आलेला प्रत्यय.

**टिपा :** नारा, विठा, गोंदा, महादा : नामदेवाचे चार पुत्र होते. त्यांना ज्याप्रमाणे विठ्ठलाने आपल्या चरणी जागा दिली. तशाप्रकारे विठ्ठलाने माझ्यावर कृपा करावी; असे जनाबाई म्हणते.

## १.६ समारोप

मध्ययुगीन मराठी वाङ्मयाच्या कालखंडात उदयास आलेल्या संतकवयित्रींच्या मेळ्यातील जनाबाईंचे स्थान अनन्यसाधारण असे आहे. तिची अभंगगाथा ही तिच्या जीवनचरित्राची कहाणी आहे. एक सामान्य स्त्री दासीपणाचे जीवन जगत आध्यात्मिकदृष्ट्या किती उंची गाठू शकते, याचे उत्तम उदाहरण म्हणून जनाबाईचे चरित्र आपल्यासमोर एक आदर्श उभा करते. गृहिणी, साधक आणि सिद्ध अशा चढत्या क्रमाने विकसित होत गेलेली जनाबाईची व्यक्तिरेखा भक्त आणि परमेश्वर यांच्यातील नातेसंबंधांचा सुंदर गोफ विणताना दिसते.

## १.७ प्रश्न व उत्तरे

■ **योग्य पर्याय निवडा.**

१. जनाबाईची 'तेलफणी' कोण करीत असे?
(रुक्मिणी/करुंड/विठ्ठल/नामदेव) (विठ्ठल)

२. जनाबाई कोणाच्या घरी सेवा करीत असे?
(विठ्ठल/नामदेव/चोखामेळा/ज्ञानदेव) (नामदेव)

३. जनाबाईने कोणत्या शब्दांचा मारा करून विठ्ठलाला प्राप्त केले?

(सोऽहम्/रामकृष्ण हरी/श्रीराम/कृष्ण) (सोऽहम्)

४. 'मूळ मायेच्या कारट्या' असे जनाबाई कोणाला उद्देशून म्हणते?

(विठ्ठल/नामदेव/अजामेळा/गोणाई) (विठ्ठल)

५. विठ्ठलाच्या पायात कोणता दागिना आहे?

(खडाव/पैंजण/कडी/साखळी) (पैंजण)

■ **दीर्घोत्तरी प्रश्न**

■ **जनाबाई आणि विठ्ठल यांच्यातील नातेसंबंधाचे वर्णन करा.**

**प्रास्ताविक :** तेराव्या शतकातील संतमेळ्यातील जनाबाईचे व्यक्तिमत्त्व भावमधूर आहे. मराठवाड्यातील गोदाकाठच्या गंगाखेड या गावातील दमा आणि करुंड या दाम्पत्याच्या पोटी तिचा जन्म झाला. त्यांना झालेल्या स्वप्न-दृष्टांतानुसार त्यांनी जनाबाईला पंढरपुरातील दामाशेट (दामा शिंपी) यांच्या कुटुंबाला अर्पण केले. दामाशेटच्या कुटुंबात इतर मुलालेकरात जनाबाईचेही पालनपोषण झाले. तिने नामदेवांच्या संगे विठ्ठलभक्ती करून आपला उद्धार करून घेतला.

**विवेचन :** आपल्या पोरकेपणाच्या सततच्या जाणिवेतून जनाबाईने विठ्ठलाची सदैव करुणा भाकली. आपली दैनंदिन घरकामे करीत असताना जनाबाई विठ्ठलाशी संवादीभाव ठेवते. जनाबाईच्या भक्तीवर प्रसन्न होऊन विठ्ठल जनाबाईला घरकामात मदत करतो. येथून पुढच्या विवेचनासाठी 'विठ्ठलमय झालेली जनी' हा मुद्दा वाचावा.

विठ्ठल आणि जनाबाई यांच्यातील नातेसंबंधात भक्त, परमेश्वर, मुलगी, आई अशी विविध रूपे आपणास दिसतात. या विविध रूपांच्यामधून मध्ययुगीन संतपरंपरेने आपल्या आराध्य दैवताशी विणलेला नातेसंबंधांचा गोफ आपल्याला दिसून येतो.

**समारोप :** जनाबाईने विठ्ठल आपल्या जीवनाशी किती एकरूप झालेला आहे, हे सांगत असताना विठ्ठलाने आपल्याला प्रत्येक कामात केलेल्या मदतीची नोंद केली आहे. भक्त आणि परमेश्वर यांच्या नात्यातील भावनिकतेचा गहिवर किती निखळ असतो याची साक्ष तिच्या अभंगांतून पटते. 'माझे जनीला नाही कोणी', 'दुबळीचा सोहळा', 'येग येग विठाबाई', 'जनी म्हणे माय आली', 'न्हाऊ घाली माझा सखा' या सारखी मायेनं ओथंबलेली जनाबाईची भाषाशैली विठ्ठलाचे भक्तवत्सल रूप साक्षात उभे करते.

■ **लघुत्तरी प्रश्न**

■ **विठ्ठलाच्या नामस्मरणाचे महत्त्व जनाबाईने कसे सांगितले आहे?**

**प्रास्ताविक :** नवविधा भक्तीमध्ये नामस्मरण भक्तीला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. भगवद्‌गीतेत सुद्धा कृष्णाने नामसंकीर्तन सोहळ्याचे महत्त्व विशद केलेले आहे. त्यामुळेच सर्व संतमंडळींनी नामस्मरणाला विशेष महत्त्व दिले आहे. जनाबाईने तर 'सोऽहंम' शब्दाचा मारा करून विश्वव्यापक परमेश्वराला आपलेसे केले होते. त्यामुळेच तिने नामस्मरणाचे महत्त्व विशेष वर्णिलेले आहे.

**विवेचन :** जनाबाईने नामस्मरणाचे महत्त्व ओळखले होते. केवळ नामस्मरणाच्या जोरावर विठ्ठलास आपण मिळवू शकतो हा तिचा स्वानुभव होता. त्यामुळेच नाम हे तारक आहे. उद्धारक आहे. याची साक्ष देताना जनाबाई अजामेळ, चोखामेळा यांच्या उद्धाराचे दाखले देते. 'नाम विठोबाचे घ्यावे। मग पाऊल टाकावे।' असा आग्रह ती व्यक्त करते. नामसंकीर्तनात आळस, निद्रा सोडून द्यावी. अत्यंत प्रेमळ अंतःकरणाने विठ्ठलाचे मुखी नाम घ्यावे. आपले अस्तित्व विसरून विठ्ठलाच्या पायी मिठी घालावी. असे झाले तर आपण विठ्ठलाच्या कृपेला पात्र होऊ असे जनाबाई सांगते.

**समारोप :** नामस्मरण व हरिकथेच्या सोहळ्यामुळे चौऱ्याऐंशी लक्ष योनीचा येरझारा संपतो. सीताकांताची प्राप्ती आपल्याला होते, असे जनाबाई म्हणतात.

## १.८ सरावासाठी प्रश्न

■ **योग्य पर्याय निवडा.**

१. कबीराला शेले विणण्यासाठी कोण मदत करतो?
(विठ्ठल/नामदेव/श्रीराम/कृष्ण)

२. गोराकुंभाराच्या संगतीने विठ्ठल कोणते काम करतो?
(चिखल तुडवितो/पाणी भरतो/शेले विणतो/माती आणतो)

३. जनाबाईला साळी कांडतांना कोणाची मदत होते?
(रुक्मिणी/गोणाई/विठ्ठल/राम)

४. द्रौपदीची पाठराखण कोणी केली?
(नारायण/नामदेव/कबीर/राम)

५. विठ्ठल कशामुळे काकुळतीला आला?
(सोऽहंम शब्दामुळे/अपार कष्टामुळे/तहानभुकेमुळे/चालून)

■ **दीर्घोत्तरी प्रश्न**

१. विठ्ठलभेटीची तृप्तता जनाबाईने कशी व्यक्त केलेली आहे ते सांगा.

२. विठ्ठल भक्तांचा पाठीराखा आहे हे जनाबाईने कशाप्रकारे पटवून दिलेले आहे ते सांगा.

■ **लघुत्तरी प्रश्न**

१. जनाबाईच्या घरकामात विठ्ठलाने केलेली मदत लिहा.

२. विठ्ठलभेटीसाठी जनाबाईच्या मनाला लागलेली ओढ स्पष्ट करा.

३. जनाबाईच्या अभंगातून 'स्त्रीसहजसुलभभाव' कशाप्रकारे व्यक्त झालेला आहे, ते स्पष्ट करा.

## १.९ अधिक वाचन

१. महाद्वाराच्या पायरीशी : संपादक : हेमंत इनामदार, ल. रा. नसिराबादकर

२. रोकडे पाझर : राजन गवस, दर्या प्रकाशन, कात्रज, पुणे. पहिली आवृत्ती डिसेंबर, २००९

३. ज्ञानराज संत जनाबाई विशेषांक : प्रकाशक श्री ज्ञानदेव सेवा मंडळ, ठाणे, जानेवारी, १९९७

## १.१० उपक्रम

'संत जनाबाई' हा चित्रपट पाहावा आणि जनाबाईची चरित्रकथा समजून घ्यावी.

❑❑❑

# सत्र ३ : घटक २

# जनाबाईचे अभंग : क्षणचित्रे, भारुड व काकड आरती

## २.१ उद्दिष्टे

या घटकाचे वाचन केल्यानंतर आपणास;

- क्षणचित्रे; भारुड व काकड आरती या शीर्षकांच्या अभंगातून जनाबाई, नामदेव व विठ्ठल यांच्यातील शिष्य, गुरू आणि परमेश्वर या नातेसंबंधाचे दर्शन होईल.
- नामदेवांची जन्मकथा व वंशवृक्षाची माहिती होईल.
- जनाबाई आणि ज्ञानदेव यांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय होईल.
- जनाबाईने रेखाटलेल्या विठ्ठलाच्या मनोहारी रूपाचे दर्शन होईल.

## २.२ विषय विवेचन

'जनाबाईचे अभंग' या तुम्हाला अभ्यासास असणाऱ्या पाठ्यपुस्तकामधील 'जनाबाई आणि विठ्ठल' या शीर्षकांतर्गातील पंचवीस अभंगाचे विवेचन आपण घटक एकमध्ये पाहिले. या घटकामध्ये आपण जनाबाईने विठ्ठल, ज्ञानदेव आणि नामदेव यांची रेखाटलेली क्षणचित्रे; भारुड व काकड आरती या जनाबाईच्या काव्याचा परिचय करून घेणार आहोत. क्षणचित्रांच्यामध्ये आपण एकूण अकरा अभंगांची निवड केलेली आहे. तर 'भारुड' आणि 'काकड आरती' या इतर रचनाप्रकारांची निवड करण्यात आलेली आहे. या सर्वाबद्दलचे विवेचन आपण पुढीलप्रमाणे पाहणार आहोत.

**क्षणचित्रे :** जनाबाईने रेखाटलेली क्षणचित्रे ही विठ्ठल, ज्ञानदेव व नामदेवांची उत्कट अशी व्यक्तिचित्रे आहेत. भक्तिरसाच्या कुंचल्याने चित्रित केलेली ही व्यक्तिचित्रे जनाबाईचे 'भक्त' या पातळीवर नातेसंबंध किती दृढ होते हे लक्षात आणून देतात.

**विठो माझा लेकुरवाळा :** सकल संतमेळ्याचा श्रद्धेचा विषय विठ्ठल हा आहे. जनाबाई देखील त्याला अपवाद नाही; त्यामुळेच ती विविध पातळीवर विठ्ठलाशी आपले नातेसंबंध जोडते. विठ्ठलामुळेच आपल्या जीवनाला अर्थ आलेला आहे; हे सांगतांना ती लग्न वऱ्हाडाचे उदाहरण देते. नवरदेवामुळेच त्याच्या वऱ्हाडाला पुरणपोळीचे गोडधोड जेवण मिळते. परिसामुळे लोखंडाचे सोन्यात रूपांतर होते. तद्वत विठोबाची जोड लाभल्यामुळे आपल्या आयुष्याला देखील संपन्नता आली असे ती सांगते. अभंग पाहा.

'नोवरीया संगे वऱ्हाडीया सोहोळां।
मांडे पुरणपोळ मिळेअका।।
परीसाचेनि संगे लोहो होय सोनें।
तयाची भूषणे श्रीमंतासी।।
जनी म्हणे जोड जाली विठोबाची।।
दासी नामयाची म्हणोनियां।'

स्त्रीसहजसुलभ भावनेच्या अनुभूतीतून जनाबाई विठ्ठलाकडे बघते. त्यावेळी ती विठोबामध्ये लेकुरवाळ्या मातेचे रूप बघते. सर्व संतपरंपरेला आपल्या अंगा-खांद्यावर खेळवणारी, वात्सल्यानं न्हाऊन निघालेल्या विठाई माउलीचं तिनं रेखाटलेल शब्दचित्र अत्यंत विलोभनीय असं आहे. अभंग पाहा.

'विठो माझा लेकुरवाळा। संगे लेकुरांचा मेळा।।
निवृत्ती हा खांद्यावरी। सोपानाचा हात धरी।
पुढें चालें ज्ञानेश्वर। मागे मुक्ताई सुंदर।
गोरा कुंभार मांडियेवरी। चोखा जीवा बरोबरी।।
बंका कडियेवरी। नामा करांगुळी धरी।।
जनी म्हणे गोपाळा। करी भक्तांचा सोहळा।।'

विटेवर पाय जोडून उभा असणारा विठ्ठल जनाबाईला मदनाचा पुतळा वाटतो. गळ्यात वैजयंतीमाळा, कानामध्ये मकर कुंडले घातलेल्या सावळ्या रूपाचे लावण्य म्हणजे 'दर्शनसुखाची धन्य शोभा' आहे असे ती म्हणते. अभंग पाहा.

'पाय जोडूनी विटेवरी। कर ठेउनी कटावरी।।
रूप सावळे सुंदर। कानी कुंडलें मकराकार।।
गळा वैजयंती माळा। तो हा मदनाचा पुतळा।।
गरुड सन्मुख उभा। जनी म्हणे धन्य शोभा।।

आपल्या आयुष्यातील एकाकीपणाची पोकळी विठ्ठलाने भरून काढावी असे जनाबाईला वाटते. नामदेवांच्या कुंटुंबातील सर्व सदस्यांना विठ्ठलाने आपल्या पायी आश्रय दिला. तद्वत आपल्यालाही पांडुरंगाने जवळ करावे; अशी आर्त हाक ती पांडुरंगाला मारते. पांडुरंगाची तिने केलेली आळवणी मनाचा तळ ढवळून काढणारी अशी आहे. अभंग पाहा.

'राजाई गोणाई। अखंडीत तुझे पायीं।।
मज ठेवियलें द्वारी। नीच म्हणोनि बाहेरी।
नारा गोंदा महादा विठा। ठेवियलें अग्रवाटा।।
देवा केव्हां क्षेत्र देसी। आपुली म्हणोनि जनी दासी।।

विठोबाची लावण्यशोभा रेखाटणारी जनाबाई विठ्ठलाशी एकरूप झालेली होती. तिचे सर्व व्यवहार विठ्ठलमय झालेले होते. तिच्या दासीपणाच्या एकाकी जीवनात विठ्ठलभक्तीच्या सोहळ्याने आनंद भरलेला होता. याचे प्रत्यंतर आपणास तिने रेखाटलेल्या विठ्ठलाच्या भावचित्रातून येते.

### सखा माजा ज्ञानेश्वर

जनाबाईच्या मनात विठ्ठलाप्रमाणेच ज्ञानेश्वरांविषयी अपार प्रेम आहे. आदर आहे. ज्ञानदेवांचा आध्यात्मिक अधिकार जनाबाईने ओळखला आहे. जनाबाईला ज्ञानेश्वर आपल्या आध्यात्मिक वाटेवरचा 'सखा वाटतो; इतकेच नव्हेतर ज्ञानदेवांनी पुढल्या जन्मी आपल्या पोटी जन्माला याचे अशी इच्छा ती प्रकट करते. तिची ही इच्छा ज्ञानदेव आणि जनाबाई यांच्यातील 'भक्तिसौख्याचा' अद्‌भूत साक्षात्कार आहे असे वाटते.

'ज्ञानाचा सागर। सखा माझा ज्ञानेश्वर।।
मरोनिया जावें। बा माझ्या पोटा यावे।।
ऐसें करीं माझ्या भावा। सख्या माझ्या ज्ञानदेवा।।
जावें वोवाळुनी। जन्माजन्मीं दासी जनी।।'

ज्ञानदेवांचे प्रेम म्हणजे मातृत्वाचा वर्षाव, अशी जनाबाईची धारणा आहे. लौकिक जीवाचा प्रवास पारलौकिकाकडे व्हावयाचा असेल तर ज्ञानदेवांचा आधार घ्यावा असे तिला वाटते. म्हणून ती ज्ञानदेवांचा उल्लेख 'तारू' असा करते. ज्ञानदेवांसारख्या सद्‌गुरूचे चरण आपले चित्त, वित्त, गोत्र आहे. पतिव्रतेच्या मनात आपल्या पतीशिवाय दुसऱ्या कोणाचाही विचार येत नाही, तद्‌वत ज्ञानदेवांच्या चरणाशिवाय आपल्या मनात इतर कोणताही विचार नाही असे ती सांगते. यामधून ज्ञानदेवांच्या भक्तीत ती किती एकरूप झालेली होती, हे आपणास दिसून येते.

'मायेहुनि माय मानी। करी जीवाची ओंवाळणी।।
परलोकींचें तारुं। म्हणे माझा ज्ञानेश्वरू।।
वित्त गोत चित्त पाहे। सत्य वंदी गुरूचे पाय।।
पतिव्रते जैसा पती। जनी म्हणे सांगो किती।।'

### नामयाचा जन्म मूळ संचित

स्वतःचा उल्लेख नामयाची दासी असा करणारी जनाबाई आपला आणि नामदेवांचा युगायुगांचा असणारा नातेसंबंध आपल्या अभंगातून व्यक्त करते. त्यासाठी प्रल्हाद-पद्‌मिनी; अंगद-मंचरा, उद्धव-कुब्जा असा आपला पूर्वइतिहास कथन करते. कलियुगात विठ्ठलभक्त नामदेवाची सेवा करण्यासाठी त्याच्या घरी आपण दासी बनून आले असे श्रद्धापूर्वक अंतःकरणाने सांगते.

‘ऐका हा नामयाचा जन्म मूळसंचित।
हिरण्यकश्यपकुळी नामा प्रल्हाद।।
पद्मीणी नाम माझें श्रेष्ठ दासीचे पद।
दुसरा जन्म याचा अंगद रामभक्त।।
मंथरा नाम माझे भरतें मारिली लाथ।
द्वापारीं कृष्णसेवा उद्धव जन्मला।।
कुबज्या नाम माझें देवें उद्धार केला।
कलीत नामदेव विठ्ठल चिंतनी।
त्याचीच सेवेलागी दासी जन्मली जनी।।’

नामदेवाची आई ‘गोणाबाई’ हिने पांडुरंगावर प्रेम करणारा पुत्र आपल्या पोटी जन्माला येऊ दे असा नवस केला होता; त्यामुळेच विठ्ठलावर प्रेम करणाऱ्या नामदेवाचा जन्म झाला; असे नामदेवाच्या विठ्ठल प्रेमाचे गुपित ती सांगते. अभंग पाहा.

‘गोणाईनें नवस केला। देवा पुत्र देईं मला।।
ऐसा पुत्र देईं भक्त। ज्याला आवडे पंढरीनाथ।।
शुद्ध देखोनियां भाव। पोटीं आले नामदेव।।
दामशेटी हरुषला। दासी जनींने ओवाळिला।।’

जनाबाई नामदेवाच्या घरातच लहानाची मोठी झालेली आहे. नामदेवाच्या परिवाराची ती साक्षीदार आहे. त्यामुळेच नामदेवाचे आईवडील, बहीण, मुलगा, मुलगी आणि सुना असा नामदेवांचा ‘वंशवृक्ष’ ती आपल्या लयबद्ध अभंगातून सांगते. अभंग पाहा;

‘‘गोणाई राजाई दोघी सासू सूना।
दामा नामा बापलेंक।।
नारा विठा गोंदा महादा चवघे पुत्र।
जन्मले पवित्र त्याचे वंशी।।
लाडाई गोडाई मेसाई साखराई।
चवघी सुना पाहीं नामयाच्या।।
लिंबाई ती लेकी आऊबाई बहिणी।
वेडीपिशी जनी नामयाची।।’’

जनाबाई नामदेवाच्या घराचा उल्लेख ‘विठ्ठल प्रेमाचा कारखाना’ असा करते. नामदेवाच्या घरातील सर्व सदस्य विठ्ठल भक्तीत रममाण झालेले होते. प्रत्येक व्यक्ती आपापल्या परीने विठ्ठल भक्तीचा नामसोहळा

'नादमय' करीत होता. आणि आपण 'घड्याळ मोगरी'च्या रूपात साक्षीदार होते असे ती प्रेमानंदाने सांगते. अभंग पाहा;

'धरा सतराचा हो मेळा। कारखाना जाला गोळा।।
वाजविती आपुल्या कळा। प्रेमबळा आनंदे।।
झडतो नामाचा चौघडा। ब्रह्मी ब्रह्मरूपींचा हुडा।।
संत ऐकताती कोडां। प्रेमबळा आनंदे।।
नामा दामा दोनी काळू। नामा विठा दमामे पैलू।।
चौघी सुना चारी हेलू। कडकडां बोल उमटती।।
गोंदा म्हादा करणी करी। नादें दुमदुमली पंढरी।।
आऊबाई तुतारी। मंजुळ उमटती स्वरी।।
गोणाबाई नौबतपल्ला। नाद अंबरी कोंदला।।
राजाई झांज मंजूळ बोला। मंजुळस्वर उमटला।।
जनाबाई घड्याळ मोगरी। घटका भरतां टोला मारी।।
काळ व्यर्थचि गेला तरी। गजर आनंदें करी।।

जनाबाई नामदेवाच्या वंशवृक्षाची जशी साक्षीदार होती; त्याचप्रमाणे त्यांच्या कीर्तन व भक्तीची ती साक्षीदार होती. नामदेवांचे कीर्तन किती प्रभावी होते; देवदेवता त्याच्या कीर्तनभक्तीत कसे रममाण होऊन जात असत. याचे जनाबाईने केलेले वर्णन 'कीर्तनकार नामदेवांचे' सजीव चित्र आपणासमोर उभे करते. या चित्रणातून विठ्ठल भक्तीत रममाण झालेले नामदेव आपणा समोर उभे राहतात तसेच कीर्तनाद्वारे सर्व वैष्णवांना एकत्रित करून - 'ज्ञानाचा दीप' लावणारे ध्येयनिष्ठ विठ्ठलभक्त नामदेव आपल्यासमोर साकारले जातात. अभंग पाहा;

''सुंबाचा करदोडा रकट्याची लंगोटी।
नामा वाळवंटी कथा करी।।
ब्रह्मादिक देव येवोनि पाहाती।
आनंदे गर्जती जयजयकार।।
जनी म्हणे त्याचे काय वर्णूं सुख।
पाहाती जे मुख विठोबाचें।।''

नामदेवांनी आपल्याबरोबरच्या समकालीन संतांची चरित्रे रेखाटली होती; पण संत जनाबाईने नामदेवांचा वंशवृक्ष, कुटुंबकथा, विठ्ठलभक्ती, कीर्तनकला इ. आपल्या अभंगातून रेखाटून संत नामदेवांचे चरित्र संपूर्ण महाराष्ट्राला खुलं करून ठेवण्याची अजोड कामगिरी केलेली आहे, हे आपणास मान्य करावे लागेल.

**काव्यप्रकारांची विविधता**

जनाबाईंनी अभंगाबरोबरच भारूड, काकडा, पदे, कुटे, जात, आख्यानकाव्य यासारखे विविध काव्य प्रकार सहजतेने हाताळलेले दिसतात. विठ्ठलभक्ती, नामदेवांचे प्रेम, पारमार्थिकता यांचे मिश्रण या काव्य प्रकारात आपणास दिसून येते. आपल्याला इथे 'भारुड' आणि 'काकड आरती' या रचनाप्रकारांचा विचार करावयाचा आहे.

**भारुड**

भक्ती आणि परमेश्वर यांच्या आड येणारी एक गोष्ट म्हणजे विकार-वासना ही होय. आपल्या भारूडामधून जनाबाईने याच वर्मावर नेमके बोट ठेवलेले आहे. या भारुडाच्या माध्यमातून महाराष्ट्राचे लोकदैवत खंडेराया याच्याकडे मागितलेले मागणं अत्यंत गमतीदार असे आहे. आपली सासू, सासरा, नणंद मरून जाऊ देत असा नवस ती खंडेरायाकडे करते. हा नवस म्हणजे एक रूपक आहे. इथला सासरा हा व्यवहारातला नसून 'अहंकार' हा सासरा आहे. सासू म्हणजे 'विकल्प' तर नणंद म्हणजे 'द्वेषाचे' प्रतीक आहे. हे सर्व मरू देत म्हणजे मला विकारमुक्त होऊन खंडेरायाचरणी निष्ठेने सेवा करता येईल. अशी विनंती या भारुडाच्या माध्यमातून ती करते. पाहा;

'खंडेराया तुज करिते नवसू।
मरूं दे रे सासू खंडेराया।।
सासू मेल्यावरी तुटेल आसरा।
मरूं दे सासरा खंडेराया।।
सासरा मेलिया होईल आनंद।
मरूं दे नणंद खंडेराया।।
नणंद मरतां होईन मोकळी।
गळां घालीन झोळी भंडाराची।।
जनी म्हणे खंडे अवघे मरूं दे।
एकटी राहूं दे पायापाशी।।'

लोकांचे मनोरंजन करता करता त्यांना आध्यात्मिक बोध करणेसाठी 'भारुड' हा काव्यप्रकार संतांनी हाताळलेला आहे. भवानी, खंडोबा, जोतीबा, अंबामाता अशा विविध लोकदैवतांनी महाराष्ट्राचे बहुजन मानस भरून गेलेले आहे. त्या लोकदैवतांना आपल्या भारुडातून आवाहन करून रूपकाच्या माध्यमातून पारमार्थिक बोध संत करतात. जनाबाईंच्या या भारुडात याचे प्रत्यंतर आपणास येते.

**काकड आरती**

आर्तता हा 'आरती' या काव्यप्रकाराचा स्थायीभाव आहे. संतांनी रचलेल्या विविध देवदेवतांच्या आरत्या काव्यवैभवांनी नटलेल्या अशा आहेत. आपल्या आराध्य दैवतांना विविध विशेषणांनी गौरविणे हा

हा आरतीरचनेमागील उद्देश असतो. आरतीमध्ये काकड आरती, माध्यान आरती, सायं आरती, धुपारती, शेजारती अशी विविधता दिसते. प्रत्येक आरतीमधील शब्दकळेत आपणास विविधता दिसते.

भल्या पहाटे देवाला जागविण्यासाठी भक्तमंडळी हातामध्ये 'काकडा' घेऊन ओवाळतात. या प्रसंगी जी आरती म्हंटली जाते तिला 'काकड आरती' असे म्हणतात. जनाबाईने आपल्या काकड आरतीमधून पांडुरंगाला कृपाळू, दीनोद्धारक, घननीळ अशा विविध विशेषणांनी गौरविले आहे. वाळवंटापासून महाद्वारापर्यंत सर्व भक्तजनांचा मेळा दर्शनासाठी हात जोडून उभा आहे. नारद, तुंबर, गिरजेचा कांत, इ. देवदेवता विठ्ठलाच्या दर्शनासाठी उत्सुकलेले आहेत. पंढरीनगरीतल्या सर्व लेकीसुना हातामध्ये पंचारती घेऊन पांडुरंगाला ओवाळण्यासाठी आतुर झालेल्या आहेत. चार युगीचा भक्त नामदेव कीर्तन करण्यासाठी उभा आहे आणि आपण स्वतः या सर्वांच्या मागे शांतपणे उभी आहे. जनाबाईने रेखाटलेले हे चित्र पहाटेच्या रम्यतेचा सुखद अनुभव देते. गिरजेचा कांत, देवस्त्रिया, रखमाबाईचा पती, चौयुगांचा भक्त नामा यासारखी शब्दकळा विठ्ठलाच्या दर्शनसुखाची आतुरता सहज व्यक्त करतात. पांडुरंगाविषयीची तिची आर्तता स्पष्ट करतात. पाहा–

'उठा पांडुरंगा प्रभात समयो पातळा।
वैष्णवांचा मेळा गरुडापारीं घातला।
वाळवंटापासुनी महाद्वारापर्यंत।
सुखराची दाटी उभी जोडुनि हात।
शुकसनकादिक नारद तुंबर भक्तांच्या कोटीं।
कवडाआडुनि पाहताती जगजेठी।
सुखरांची विमाने गगनी दाटली सकळ।
रखुमाई माते वेगीं उठवा घननीळ।
रंभादिक नाचती उभ्या जोडुनि हात।
त्रिशूल डमरू घेऊनि आला गिरजेचा कांत।
पंचप्राण आरत्या घेंऊनि देवस्त्रिया येती।
भावे ओवाळिती राई रखुमाबाईचा पती।
अनंत अवतार घेसी भक्ताकारणें।
कनवाळु कृपाळू दीनालागी उद्धरणें।
चौयुगांचा भक्त नामा उभा कीर्तनी।
पाठीमागे डोळे झांकुनी उभी ते जनी।।'

## २.३ शब्दार्थ व टिपा

- **सुंब :** सुंभ किंवा काथ्याची दोरी
- **रकटे :** जुने, जाडेभरडे कापड
- **चौयुग :** सत्य, त्रेता, द्वापार, कली ही चार युगे
- **काकड आरती :** पहाटे देवाला काकडा पेटवून केलेली आरती
- **राजाई :** संत नामदेवांच्या पत्नीचे नाव
- **गोणाई :** संत नामदेवांच्या आईचे नाव
- **नारा, गोंदा, महादा, विठा :** नामदेवांचे चार पुत्र
- **अग्रवाटा :** मार्गावर अग्रस्थानी, किंवा पुढे

## २.४ समारोप

जनाबाईने रेखाटलेली क्षणचित्रे; भारुड व काकडा या रचना आपण पाहिल्या. ज्ञानदेवांचे आध्यात्मिक व्यक्तिमत्त्व समकालीन व त्यानंतरच्या संतमेळ्याला कसे आदर्श वाटत होते, हे जनाबाईच्या 'सखा माझा ज्ञानेश्वर' या अभंगातून आपणास दिसून येते. जनाबाईने रेखाटलेला 'नामदेवांचा वंशवृक्ष' नामदेवांचे विठ्ठलमय जीवन आपणासमोर साकार करतो. सकल संतगाथेत नामदेव आद्यचरित्रकार म्हणून ओळखले जातात; पण नामदेवांच्या चरित्राची आद्यचरित्रकार जनाबाई होती याची साक्ष आपणास इथे पटते. अभंगाबरोबरच भारुड, काकड आरती या सारख्या विविध काव्यरचना जनाबाईने किती समर्थपणे हाताळल्या होत्या याची माहिती आपणाला इथे होते.

## २.५ प्रश्न व उत्तरे

**१. योग्य पर्याय निवडा.**

१. 'ज्ञानाचा सागर' म्हणून जनाबाई कोणाचा उल्लेख करते?
(ज्ञानदेव/नामदेव/विठ्ठल/दामाशेटी) (ज्ञानदेव)

२. द्वापारयुगात आपण कोण होतो असे जनाबाई सांगते.
(कुबज्या/सीता/रुक्मिणी/मंथरा) (कुबज्या)

३. जनाबाईने कोणाला नवस केलेला आहे?
(खंडेराया/विठ्ठल/ज्ञानदेव/जोतीबा) (खंडेराया)

४. ‘लेकुरवाळा’ म्हणून जनाई कोणाचा उल्लेख करते?

(विठ्ठल/नामदेव/गोणाई/दामाशेटी) (विठ्ठल)

५. ‘लिंबाई’ नामदेवांची कोण होती?

(बहीण/वहिनी/सून/लेक) (बहीण)

**२. दीर्घोत्तरी प्रश्न**

**१. नामदेवांच्या कुटुंबकथेचे चित्र जनाबाईने कसे रेखाटलेले आहे?**

**प्रास्ताविक :** जनाबाई नामदेवांच्या घरी लहानाची मोठी झाली. ‘नामयाची दासी’ म्हणवून घेत, नामदेवांच्या कुटुंबाची सेवा करीत, नामदेवासंगे विठ्ठलभक्तीत रममाण झाली. आपल्या अभंगातून विठ्ठल भक्तीबरोबरच नामदेवाविषयीचा आदरभाव तिने वर्णन केला आहे. या आदरभावातूनच तिने नामदेवाचा वंशवृक्ष आपल्या अभंगातून सांगितला.

**विवेचन :** स्वतःचा उल्लेख नामयाची दासी असा करणारी जनाबाई आपला आणि नामदेवांचा युगायुगांचा असणारा नातेसंबंध आपल्या अभंगातून व्यक्त करते. प्रल्हाद-पद्मिनी, अंगद-मंथरा, उद्धव-कुब्जा असा आपला पूर्व इतिहास ती कथन करते. नामदेवाची आई ‘गोणाबाई’ हिने पांडुरंगावर प्रेम करणारा पुत्र आपल्या पोटी जन्माला येऊ दे असा नवस केला होता. त्यामुळे विठ्ठलावर प्रेम करणाऱ्या नामदेवाचा जन्म झाला. असे सांगून नामदेवाच्या विठ्ठल प्रेमाचे गुपित स्पष्ट करते.

नामदेवांची आई गोणाई, दामा-नामदेवांचे वडील. नामदेवांची पत्नी राजाई. नारा, गोदा, महादा, विठा चवघे पुत्र. लिंबाई लेक, आऊबाई बहीण. हे सर्वजण मिळून विठ्ठलनामाचा गजर करतात. याचे जनाबाईने रेखाटलेले चित्र अत्यंत बहारदार आहे.

जनाबाई नामदेवांच्या वंशवृक्षाची जशी साक्षीदार होती. त्याचप्रमाणे त्यांच्या कीर्तनभक्तीची ती साक्षीदार होती. नामदेवांचे कीर्तनकार म्हणून तिने रेखाटलेले चित्र अत्यंत वस्तुनिष्ठ असे आहे.

**समारोप :** नामदेवांनी आपल्याबरोबरच्या समकालीन संतांची चरित्रे रेखाटली होती; पण संत जनाबाईने नामदेवांचा वंशवृक्ष, कुटुंबकथा, विठ्ठलभक्ती, कीर्तनकला इ. आपल्या अभंगातून रेखाटून संत नामदेवांचे चरित्र संपूर्ण महाराष्ट्राला खुलं करून ठेवण्याची अजोड कामगिरी केलेली आहे.

**३. लघुत्तरी प्रश्न**

**१. ज्ञानदेवांविषयीचा आदर जनाबाईने कसा व्यक्त केला आहे ते सांगा.**

**प्रास्ताविक :** जनाबाईच्या मनात विठ्ठलप्रेमाप्रमाणेच ज्ञानेश्वरांविषयी अपार प्रेम आहे. आदर आहे. आपल्या अभंगामधून तो प्रसंगानुरूप जनाबाईने व्यक्त केला आहे.

**विवेचन :** ज्ञानदेवांचा आध्यात्मिक अधिकार जनाबाईने ओळखलेला आहे. जनाबाईला ज्ञानेश्वर

आपल्या आध्यात्मिक वाटेवरचा सखा वाटतो. इतकेच नव्हे तर ज्ञानदेवांनी पुढल्या जन्मी आपल्या पोटी जन्माला यावे अशी इच्छा ती प्रकट करते. तिची ही इच्छा म्हणजे ज्ञानदेव आणि जनाबाई यांच्यातील भक्तिसौख्य अद्‌भूत साक्षात्कार आहे असे वाटते. ज्ञानदेवांचे प्रेम म्हणजे मातृत्वाचा वर्षाव! अशी जनाबाईची धारणा आहे. ज्ञानदेव पारलौकिकाकडे जाण्यासाठी महत्त्वाचा आधार आहेत. आपले चित्त, वित्त, गोत्र फक्त ज्ञानदेव आहेत, असे जनाबाई सांगते.

**समारोप :** 'ज्ञानाचा सागर। सखा माझा ज्ञानेश्वर।' अशा शब्दात जनाबाईने ज्ञानदेवांविषयीचा आदर व्यक्त केलेला आहे. ज्ञानदेवांचा आध्यात्मिक अधिकार सर्वश्रेष्ठ होता, पण या अधिकाराचा समकालीन संतांना किती आधार वाटत होता. याची साक्ष आपणाला जनाबाईच्या या अभंगातून पटते.

## २.६ सरावासाठी प्रश्न

### १. योग्य पर्याय निवडा.

१. 'परलोकीचे तारू' मधून जनाबाई कोणाचा उल्लेख करते?
(ज्ञानदेव/नामदेव/विठ्ठल/श्रीकृष्ण)

२. आपल्या 'भारुड' या रचनेतून जनाबाईने कोणाला आवाहन केले आहे?
(खंडोबा/म्हसोबा/भवानी/जोतीबा)

३. 'आरती' या काव्य प्रकाराचा स्थायीभाव कोणता?
(आर्तता/उत्स्फूर्तता/शोकात्मता/आनंद)

४. प्रल्हादाघरी जनाबाई कोणाच्या नावाने वावरत होती?
(पद्‌मीनी/मंचरा/कुबज्या/द्रौपदी)

५. नामदेवांना एकूण किती सुना होत्या?
(दोन/चार/पाच/सहा)

### २. दीर्घोत्तरी प्रश्न

१. विठोबाची 'लावण्यशोभा' आपल्या अभंगातून जनाबाईने कशी रेखाटली आहे ते सांगा.

२. नामदेवांच्या चरित्राचे रेखाटन जनाबाईने कसे केले आहे ते सांगा.

### ३. लघुत्तरी प्रश्न

१. जनाबाईच्या 'काकड आरती'मधील विठ्ठल भक्तीची आर्तता स्पष्ट करा.

२. जनाबाईच्या 'भारुडा'तील रूपकात्मकता स्पष्ट करा.

३. जनाबाईने 'लेकुरवाळ्या विठोबाचे' चित्र कसे रेखाटले आहे ते सांगा.

## २.७ अधिक वाचन

१. जनाबाईचे निवडक अभंग : एक चिंतन, संपादिका - डॉ. सुहासिनी इर्लेकर

२. संत नामदेव, डॉ. हे. वि. इनामदार

## २.८ उपक्रम

संत जनाबाई, संत नामदेव या मराठी चित्रपटांच्या चित्रफिती मिळवून बघा. संतांचे चरित्र समजून घ्या.

❑❑❑

# सत्र ३ : घटक ३

# जनाबाईंची उपदेशवाणी

## ३.१ उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासाने आपणास

- संत जनाबाईंच्या उपदेशाचे स्वरूप समजून घेता येईल.
- संत जनाबाईंच्या उपदेशातील सामाजिकता, व्यापकता व तळमळ लक्षात येईल.
- भक्तीचे खरे स्वरूप व संतसंगतीचे महत्त्व लक्षात येईल.
- एका स्त्रीने केलेला उपदेश म्हणून तिच्या उपदेशाचे वेगळेपण लक्षात येईल.

## ३.२ प्रास्ताविक

मराठी संस्कृती आणि मराठी मन यांचे भरणपोषण संतसाहित्याने केले आहे. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम या वारकरी संतांनी आपल्या वाणीने मराठी सारस्वताला वैभवसंपन्न बनविले. यात मुक्ताई, जनाबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई या संत कवयित्रींचाही मोलाचा वाटा आहे. यातही संत जनाबाईंची अभंगवाणी आपल्या वेगळेपणाने उठून दिसणारी आणि भावमधूर आहे. संत नामदेवगाथ्यात तिचे सुमारे साडेतीनशे अभंग उपलब्ध आहेत. यातून तिने विविध विषयांवर भाष्य केलेले आढळते.

नामदेवांच्या 'घरची दासी जनी' असा तिचा उल्लेख केला जातो. दासी याचा अर्थ शिष्या असाही आहे, हे लक्षात घ्यावयास हवे. महाराष्ट्रीय संतमंडळीत तिला मानाचे स्थान आहे. नामदेवांच्या विठ्ठलभक्तीशी ती एकरूप झाली. नामदेवाप्रमाणेच विठ्ठलाचे गुणगान करण्यात तिने कृतार्थता मानली. नामदेवांच्या संगतीत तिचे उपेक्षितपण कुठल्या कुठे विरून गेले. विठ्ठल तिचा सखा बनला. हरघडी प्रत्येक कामात तो तिला मदत करू लागला. तिची अभंगवाणी म्हणजे या अनुभूतीचा सहजाविष्कार होय.

## ३.३ विषय विवेचन

अनन्यसाधारण ईश्वरभक्ती हे जनाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचे आणि काव्याचे वैशिष्ट्य आहे. जनाबाईंच्या अभंगामध्ये प्रामुख्याने सात विषयांचा अंतर्भाव झालेला दिसतो. भक्ती, विठ्ठलमहिमा, संतमहिमा, नाममहिमा, उपदेशपर रचना, कथात्मक रचना आणि पदरचना अशी विविधता तिच्या अभंगवाणीत आढळते.

संत जनाबाईंने प्रामुख्याने भक्तीचा उपदेश केला. तिच्या अभंगांतून नवविधाभक्तीची रूपे पाहावयास मिळतात. त्यातही आत्मनिवेदनभक्ती आणि नामस्मरण यावर तिचा अधिक भर आहे. प्रत्येकाने ईश्वराची भक्ती करावी. भक्तिभावाने देव आकळता येतो. भक्ती हे सर्वांसाठी सुलभ असे साधन आहे. येथे जात-

पात, वर्ण यांची आडकाठी येत नाही. कोणत्याही जातीतील, वर्णातील स्त्री-पुरुष भक्तिमार्गाने परमेश्वराप्रत पोहचू शकतो, असा आपला निर्धार तिने व्यक्त केला आहे.

परमेश्वराचे नाम अत्यंत सुलभ असून ते प्रेमाने घ्यावे. नामाचा ध्यास धरावा. संसारात राहून विठ्ठलाला आळवावे. आपली नित्याची कामे करताना परमेश्वराचे स्मरण केले तरी पुरेसे आहे. स्वकर्मकुसुमांनीच त्याची पूजा करता येते. त्यासाठी कर्मत्याग करण्याची, संसार सोडण्याची आवश्यकता नाही. 'दळिता कांडिता। तुज गायिन अनंता' असे सांगून तिने भक्तिमार्गाचे सोपेपण आणि महत्त्व पटवून दिले आहे. म्हणून विद्यार्थी मित्रहो, आपण येथे संत जनाबाईच्या उपदेशवाणीचा सविस्तर परामर्श घेणार आहोत.

**भक्ति ते कठीण**

'सुखे संसार करावा। मनी विठ्ठल आठवावा' असा उपदेश जनाबाई करते. तसेच 'शिवा रामा नाही भेद। ऐसे देव तेही सिद्ध। जनी म्हणे आत्मा एक। सर्व घटी तो व्यापक' असा हरिहरैक्याचा बोधही तिने केला आहे. यावरून तिची अधिकारसंपन्नताही लक्षात येते. भक्तिभावाचेही चिंतन-मनन जनाबाईंच्या अभंगांतून प्रकट झाले आहे. सर्व चित्तवृत्ती ईश्वराच्या ठिकाणी केंद्रित करणे म्हणजेच भक्ती होय आणि हे फार कठीण काम आहे. जनाबाईने भक्तीची ही कठीणता परोपरीने सांगितली आहे. ती म्हणते;

भक्ति ते कठीण इंगळाची खाई।
रिघणे त्या डोही कठीण असे।।
भक्ति ते कठीण विषग्रास घेणे।
उदास पै होणें जीवें भावें।।
भक्ति ते कठीण भक्ति ते कठिण।
सोसी जो तो वार घडे तया।।
भक्ति ते कठिण विचारुनि पाहे जनी।
भक्तियोगे संतसमागमी सर्व सिद्धी।।

स्त्रियांनी उदास न होता, सर्वांना अधिकार देणाऱ्या भक्तिमार्गाचा स्वीकार करावा. प्रपंच करीत असतानाही विठ्ठलभक्तीने जीवन सार्थकी लावता येते, असे ती सांगते. दया, क्षमा, शांती, शुद्ध चारित्र्य, मृदुभाव, वैराग्य या सद्‌गुणांचा तिने उपदेश केला आहे. मानवी जीवन सुखी करण्यासाठी या गुणांची आवश्यकता आहे, असे तिला वाटते. अनन्यनिष्ठा व भक्तिभावाशिवाय परमेश्वराची प्राप्ती नाही. ज्याच्या जवळ अनन्यभाव असतो, त्यालाच विठ्ठल भेटतो म्हणून जनाबाई म्हणते;

भक्तिभावे वळे गा देव महाराज पंढरीराव।।
पंढरीसी जावे। संत जना भेटावे।।
भक्ति आहे ज्याचे चित्ती। त्याला पावतो निश्चिती।।
भाव धरा मनी। म्हणे नामयाची जनी।।

## वैष्णव तो एक

परधन, परकामिनी यांची इच्छा धरू नये. वाईट इच्छा नसावी, देवाची सेवा घडावी, असे जनाबाईचे मागणे आहे. कोणत्याही कुळातला, जातीतला असला तरी ज्याच्या अंगी शांती बाणली आहे, तोच संत होय. अशा संतांना जनाबाई वंदन करते. संत आणि देव एकरूप असतात. म्हणून जनाबाईला चोखामेळा, कबीर, रोहिदास, कमाल, मुकुंद जोहरी हे एकनिष्ठ वैष्णव वाटतात. लटकेच नेत्र लावून ध्यान करणाऱ्या दांभिकांवर जनाबाईंनी टीका केली आहे. या दृष्टीने तिचा पुढील अभंग चिंतनीय आहे.

वैष्णव तों एक इतर ती सोंगे।
ठसे देऊनी अंगें चितारिती ।।
जिचे योनि जन्मला तिसी दंडू लागला।
तीर्थरूप केला देशधडी ।।
नाइकोनी ब्रह्मज्ञान जो का दुराचारी।
अखंड द्वेष करी सज्जनांचा ।।
विद्येच्या अभिमाने नाइके कीर्तन।
पाखांडी हें म्हणे करिती कायी ।।
पंचरस पात्रा कांता हे बुडविती।
उद्धरलो म्हणती आम्ही संत ।।
कीर्तनाचा द्वेष करी तो चांडाळ।
तयाचा विटाळ मातंगीसी ।।
वैष्णव तो एक चोखामेळा महार।
जनी म्हणे निर्धार केला संती ।।

गंधादी मुद्रा अंगावर चितारणारे वैष्णव नव्हेत. आईवडिलांचा मान न ठेवता उलट त्यांना त्रास देणारे, ब्रह्मज्ञान न ऐकणारा दुराचारी, सज्जनांचा अखंड द्वेष करणारा; विद्येच्या अहंकारामुळे कीर्तनश्रवण न करणारा; स्वतः घरादाराचा मोह न सोडता संतांनाच पाखांडी म्हणणारा व त्यांचा उपहास करणारा; अशाच दुर्जनाचा विटाळ मानावयास हवा. म्हणून चोखामेळा महार असूनही जनाबाईंना तो वैष्णव वाटतो. असाच सर्व संतांनी निर्धार केला आहे, असे ती ठामपणे सांगते.

## संतसंगतीचे महत्त्व

संतांची संगती ही सामान्य गोष्ट नव्हे कारण अशा संतसंगतीने तात्काळ देहदशा पालटते आणि आपण देह नाही, तर आत्मस्वरूप आहोत असा बोध होतो. चंदनाच्या संगतीत आल्याने इतर झाडांनाही त्याचा सुगंध प्राप्त होतो आणि साधी लाकडेही गंधाच्या रूपाने देवाच्या माथ्यावर विराजमान होतात. त्याप्रमाणे संतसंगतीने सर्वसामान्य माणसामध्येही बदल होऊन तो संतपदवीला पोहचू शकतो. म्हणून अशा संतसज्जनांमध्ये

अग्रगणी असलेल्या ज्ञानदेवांचे जनाबाई ध्यान करते, त्यांना वंदन करते अशाप्रकारे जनाबाईने संतसंगतीचे महत्त्व पटवून दिले आहे.

संतांनी आपल्या सत्कर्मांनी (पुण्यकर्मांनी) अकर्म (वाईट कर्म) समूळ नाहीसे केलेले असते. संत हे देवाचे डोळे असतात. त्यांच्याच डोळ्यांनी देव आपल्याकडे पाहतो, त्यांच्याच कानांनी आपले चिंतन ऐकतो. संत हेच देवाचे वदन मानून जनाबाई त्यांना जीवेभावे ओवाळते.

भगवंताच्या नामस्मरणानेच भवसागर तरुन जाता येतो असा सर्व संतांचा सिद्धांत आहे. भगवंताचे नाव ही भवसागरातून पार नेणारी नौकाच आहे. भगवंतांची हजार नावे (सहस्रनाम) म्हणजे जीवाला भवसागरातून पलीकडे नेणाऱ्या हजारो नावाच आहेत, असे ज्ञानदेवांनी म्हटले आहे. जनाबाईनेही हाच भाव जहाजांचे सुंदर रूपक करून सांगितला आहे.

हे जीवरूपी जहाज तरून शेवटी उगमाच्या ठिकाणी आले, म्हणजे मूळ आत्मस्वरूपाच्या ठिकाणी एकरूप झाले. त्यासाठी भावाचे शिड लावले, नामाचा फरारा सोडला. या जहाजामध्ये कथारूपी (भगवंताच्या कथा) वस्तू (साठा-धन) ठेवल्या आहेत. म्हणून जनाबाई म्हणते त्या तुम्ही आनंदाने घ्या. मी फुकट देत आहे. मात्र अत्यंत आर्ततेने त्याचा स्वीकार करावा, असे जनाबाईला वाटते. तात्पर्य, नामाच्या सामर्थ्यानेच भवसागर तरून जाता येते, असे जनाबाईंना सांगायचे आहे.

**नाममाहात्म्य**

वारकरी संतांनी स्वीकारलेल्या नामभक्तीचाच पुरस्कार संत जनाबाईने केला. नामभक्तीच्या अनन्य-साधारणत्वाविषयी ती म्हणते;

नाम विठोबाचे घ्यावे। मग पाऊल टाकावे।।
नाम तारक हे थोर। नामे तारिले अपार।।
अजामेळ उद्धरिला। चोखामेळा मुक्तीस नेला।।
नाम दळणी कांडणी। म्हणे नामयाची जनी।।

'रामकृष्ण हरी गोविंद' हाच आपल्या मनाला छंद लागावा, जिव्हेने सतत विठोबाचे नामच उच्चारावे, विठ्ठलाचे नाम हे सर्व नामांचे सार असून, त्याचाच जप निरंतर करावा. असे सांगून जनाबाई म्हणते की, 'रामनाम हाच मंत्र सर्वांनी जपावा. हरीचे नामसंकीर्तन करावे हा जनाबाईचा निर्धार आहे. सतत संतसंग धरावा, मुखाने पांडुरंगाचा जयघोष करावा आणि लोकांना याचाच उपदेश करावा; हे आपले कर्तव्य असल्याचे जनाबाईने सूचित केले आहे. ती पुढील अभंगात म्हणते;

करूं हरीचें कीर्तन। गाऊ निर्मळ ते गुण।।
सदा धरूं संतसंग। मुखी म्हणू पांडुरंग।।
करूं जनावरी कृपा। रामकृष्ण म्हणवू लोकां।।
जनी म्हणे किती करू। नाम बळकट धरूं।।

अनेक प्रकारची व्रते, तपे, दान करतानाही मुखाने हरिस्मरण करणे आवश्यक आहे. अन्यथा हे सर्व व्यर्थ आहे. भगवंताच्या नामाच्या ठिकाणी भाव असेल तर; तो आपल्या सर्व इच्छा पूर्ण करतो असा विश्वास धरावा. म्हणजे चक्रपाणि कृपा करील. ज्याच्या ठिकाणी परिपूर्ण भक्तिभाव आहे, त्याच्या समोर परमेश्वर येऊन उभा राहतो. म्हणून त्याच्या पायांशीच लक्ष असावे, असे जनाबाईंचे सांगणे आहे.

## विषयांचे संगती, बहु गेले अधोगती

विषयांची संगत घातक आहे असे सर्वच संतांनी पुनः पुन्हा सांगितले आहे. जनाबाईही हा विचार अनेक दृष्टांतांतून पटवून देतात. मंजुळ नादाला भुलून हरीण सापडतो. हत्तिणीच्या प्रेमामुळे हत्ती खड्ड्यात पडतो. सुंदर दीप पाहून पतंग तेथे झेप घेतो आणि प्राणाला मुकतो. गळाच्या गोडीने मासा गळाला अडकतो. सुगंधाला भुलून भ्रमर कमळामध्ये अडकून पडतो. त्याप्रमाणे विषयांना भुलून प्राणी जन्ममृत्यूच्या फेऱ्यात अडकून पडतो. सुखदुःखाच्या भवसागरात अडकून पडतो. यातून त्याची कधीच सुटका होत नाही. या विषयाच्या संगतीने अनेक अधोगतीला गेले आहेत. म्हणून विषयांचा संग भला नव्हे असे जनाबाई अनेक अभंगांतून सांगते. पुढील अभंगांत हा विचार अगदी सहजपणे व उत्कटतेने मांडला आहे.

पतंग सुखावला भारी। उडी घाली दीपावरी।।
परि तो देहांती मुकला। दोन्हीं पदार्थी नाडिला।।
विषयांचे संगती। बहु गेले अधोगती।।
ऐसे विषयाने भुलविलं। जनी म्हणे वायां गेले।।

चोराची संगत धरली तर वाटेत त्याची लुबाडणूकच होणार. अग्नीबरोबर खेळावयास गेला तर जळणे किंवा पोळणे हे होणारच. त्याप्रमाणे जो भक्ती सोडून विषयांची संगती धरेल तो परमार्थापासून दुरावला जाईल व त्याला अधोगती ठेवलेलीच आहे हे जनाबाई किती सहजपणे सांगते पहा;

चोरा संगतीनें गेला। वाटे जाता नागवला।।
तैसा सांडोनिया भक्ति। धरी विषयाची संगती।।
अग्निसवें खेळे। न जळे तो परी पोळे।।
विश्वासला चोरा। जनी म्हणे घाला खरा।।

## विठ्ठलमाहात्म्य आणि पंढरीमाहात्म्य

सर्वच वारकरी सांप्रदायिक संतांनी पंढरी आणि विठ्ठल यांच्याविषयी आपली अनन्यनिष्ठा व्यक्त केली आहे. पंढरी हे सर्व तीर्थांचे माहेर आहे. तर विठ्ठल हे प्रत्यक्ष परब्रह्म आहे, असा संतांचा विश्वास आहे. 'म्हणे विठ्ठल ब्रह्म नव्हे। त्याचे बोल नाईकावे। मग तो असो कोणी एक आदी करूनि ब्रह्मादिक।।' असा आपला भाव संत नामदेवांनी व्यक्त केला आहे. संता जनाबाईनेही अशाच प्रकारे आपली निष्ठा व्यक्त केली आहे. म्हणून ती लोकांनी पंढरीला जावे असा आग्रह धरते. विठ्ठलाचे दर्शन घेऊ. मुखाने हरिनामाचा गजर करू. पुंडलिकाजवळ चंद्रभागेमध्ये स्नान करू आणि पांडुरंगाला डोळे भरून पाहून,

देहभाव विसरून जाऊ. असा तिचा निश्चय आहे. हा निश्चय सर्वांनीच करावा, असा ती आग्रह धरते. कारण पंढरीची वाट ही विवेकाची पेठ आहे. तेथे कोणताही धोका नाही. येथे विठ्ठल-सखा सहज भेटतो. इतर तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी अनेक प्रकारचा धोका आहे. गंगेत बुडून मरण्याची भीती आहे. हिमालयात प्रचंड त्रास सहन करावा लागतो. पण तसा पंढरीत काहीच त्रास होत नाही. विठ्ठल सहज भेटतो. येथे कळसाचे दर्शनसुद्धा पुरेसे असते. म्हणून विठ्ठलालाच शरण जावे व अशा भक्तीने देव ऋणी करावा; असा जनाबाईंचा तळमळीचा उपदेश आहे.

मरोनियां जावे। शरण विठोबासी व्हावे।।
म्हणे नामयाची जनी। देव करा ऐसा ऋणी।।

अशा शब्दांत तिने हा भाव व्यक्त केला आहे.

**श्रेष्ठ तत्त्वकविता आणि भावकविता**

''जनाबाईंची कविता ही श्रेष्ठ तत्त्वकविता आणि भावकविता आहे. पारंपरिक भारतीय तत्त्वज्ञान आणि अध्यात्म यांची जनाबाईंना किती सखोल जाण होती याची साक्ष त्यांच्या कवितेत आपल्याला पुरेपूर पटते.'' (डॉ. प्रकाश केजकर 'संतकविता : एक दृष्टिकोन' पृ. १७७)

शरीर हे पंचमहाभूतापासून बनले असून ते नश्वर आहे. आंब्याचा रस चाखला आणि त्याची कोय फेकून दिली तर त्यापासून दुसरा वृक्ष निर्माण होतो. त्याप्रमाणे 'अहं' हे जन्ममृत्यूचे बीज आहे. ते भाजून त्याची संतांच्या चरणी ओवाळणी करावी आणि पुढील जन्माची आशा धरू नये. देहाचा अभिमान सोडावा. आपण देहधारी नाही तर आत्मस्वरूप आहोत, असा भाव धरल्याने सहजच देवत्व प्राप्त होते. तात्पर्य, देहाहंकार समूळ नाहीसा झाला तर जन्ममृत्यूतून कायमची सुटका होऊन परमेश्वराची प्राप्ती होते, असाही उपदेश जनाबाई करते. जनाबाईंच्या अभंगांतून अशाप्रकारचे तात्त्विक विवेचनही आलेले दिसते. तिला तत्त्वज्ञान, योगमार्ग यांचाही चांगला बोध आहे. त्यामुळे तिच्या निवेदनाला एक तात्त्विक बैठक प्राप्त झालेली दिसते. भावोत्कटता, तत्त्वविचारातील प्रगल्भता आणि योगानुभूती यांचा त्रिवेणी संगम तिच्या काही अभंगांत पाहावयास मिळतो. यातून तिचे संतत्त्व दिसून येते. सिद्धावस्थेतील असे अनेक अनुभव तिने आपल्या अभंगांतून आविष्कृत केले आहेत.

वारकरी संप्रदायाने पारमार्थिक क्षेत्रात स्त्रीलाही पुरुषाप्रमाणे समान अधिकार असल्याची जाणीव करून दिली. त्याचा हुंकार म्हणजे 'स्त्रीजन्म म्हणवूनी न व्हावे उदास' हा संत जनाबाईंचा अभंग होय. स्त्रियांनी उदास न होता, स्त्रीजन्माची खंत न बाळगता सर्वांना अधिकार देणाऱ्या भक्तिमार्गाचा स्वीकार करावा, असा उपदेश जनाबाई करते. प्रपंचातील नित्यकर्मे करीत असताना विठ्ठलभक्तीने जीवन सार्थकी लावता येते. साधुसंतांनी हा विश्वास माझ्या ठिकाणी निर्माण केला आहे, असे ती सांगते. जनाबाईच्या या कार्याविषयी प्रा. डॉ. सौ. मंगला सासवडे म्हणतात, ''जनाबाईंनी उपेक्षित स्त्रीवर्गाला हा फार मोठा दिलासा दिला. आजही वारकरी संप्रदायात बहुसंख्य ग्रामीण, अडाणी स्त्रिया आळंदी-पंढरीच्या दिंड्यांमध्ये दिसतात. भक्तिप्रेमाचा आनंद अनुभवतात. हा वारसा त्यांना जनाबाईंनेच प्रदान केला आहे.'' (संत

जनाबाईंची उपदेशवाणी, 'ज्ञानराज', संत जनाबाई विशेषांक, शके १९१८, पृ. ६१)

### स्त्रीजन्म म्हणवुनी न व्हावे उदास

आपण संतांच्या घरची दासी आहोत याचा जनाबाईला अभिमान वाटतो. विठोबाने आपणास प्रेमकळा दिली म्हणजे भक्तिमार्गाचे वाटेकरू केले. विदूर हीन जातीतील असला तरी, देवाने त्याचा स्वीकार केला. कुळाचा विचार न करता कान्होपात्रासारख्या गणिकेचा उद्धार केला. केवळ नामस्मरणाने तिला मुक्ती प्राप्त करून दिली. ऋषीमुनींच्या कुळांचा उच्चार केल्याने स्वर्गाची प्राप्ती होते. 'ऋषीचे कुळ पाहू नये आणि नदीचे मूळ पाहू नये' असे म्हणतात. तेच येथे जनाबाईंना सांगावयाचे आहे. तात्पर्य, भक्तीने सर्व कुळातील आणि जातीतील स्त्री-पुरुषांचा उद्धार होतो म्हणून जनाबाई भक्तिमार्गाचाच पुरस्कार करते. विठ्ठल हेच आपले निधान आहे, असे तिला वाटते. वारकरी संप्रदायाचे हे खास वैशिष्ट्य तिने पुढील अभंगात सविस्तर आणि सोदाहरण सांगितले आहे. 'यारे यारे लहान थोर, याती भलते नारी नर' हा पुढे संत तुकारामांनी सांगितलेला उपदेश या संप्रदायातील संतांनी पूर्वीपासूनच कसा मनी-मानसी मुरविला होता, त्याची यावरून कल्पना येते. जनाबाई म्हणते;

स्त्रीजन्म म्हणवुनी न व्हावे उपास।
साधुसंता ऐसें केलें जनी।।
संतांचे घरची दासी मी अंकिली।
विठोबाने दिली प्रेमकळा।।
विदुर सात्त्विक माझिये कुळीचा।
अंगिकार त्याचा केला देवें।
न विचारता कुळ गणिका उद्धरिली।
नामे सरती केली तिहीं लोकी।।
ऋषींची कुळे उच्चारिलीं जेणें।
स्वर्गावरी तेणें वस्ती केली।।
नामयाची जनी भक्तीतें सादर।
माझे ते साचार विटेवरी।।

## ३.४ समारोप

'संत वाटिकेतील जाईची वेल' असा संत जनाबाईंचा उल्लेख केला जातो. स्त्रीमनाची कोमलता, सहजता, सुलभता, परमेश्वरप्राप्तीची तळमळ, आर्तता आणि परमेश्वर क्षणोक्षणी आपला सखा-सोबती होऊन आपल्याला मदत करतो हा अलौकिक भाव ही जनाबाईंच्या अभंगवाणीची वैशिष्ट्ये आहेत. कारुण्य आणि वात्सल्य तिच्या अभंगांत पुरेपूर भरले आहे. विठ्ठलप्रेमामुळे तिच्या वाणीतील गोडवा अधिकच मधुर बनला आहे. लौकिक आणि अलौकिक अशा अनुभवांचा एक अनोखा संगम तिच्या अभंगवाणीत पाहावयास

मिळतो. ''उत्कट भक्तीतून आणि समरसतेतून जनाबाईला सर्वस्थळी, सर्वप्रसंगी विठ्ठलच दिसू लागतो. सदा सर्वकाळ तो सोबत वावरत असल्याचा भास, अडचणीत तो धावून येतो आणि आपल्याला सावरतो अशी मनोधारणा हाच मुळी एक काव्यात्म अनुभव आहे. ........ जनाबाईने झाडलोट करावी आणि चक्रपाणीने केर भरावा. तिने शेण गोळा करावे आणि विठ्ठलाने पितांबर खोचून तिच्या मागोमाग चालावे. जनीने गोवऱ्या वेचाव्या आणि विठूने त्यांची मोट उचलून तिच्या डोईवर ठेवावी. कधी त्याने तिला आंघोळीसाठी विसाण घालावे; कधी न्हाऊ घालावे; तर कधी वेणीफणीही करावी. साक्षात्काराला वास्तवाच्या पातळीवरचे इतके सहज रमणीय रूप मराठीत क्वचितच लाभले आहे. पारलौकिक आणि लौकिक अनुभवांच्या सीमा येथे एकमेकीत मिसळून जातात.'' (डॉ. ल. रा. नसिराबादकर व डॉ. हे. वि. इनामदार 'महाद्वाराच्या पायरीशी' प्रस्तावना, पृ. २७, २८, हेमंत प्रकाशन, कोल्हापूर) विद्यार्थी मित्रहो, जनाबाईंचे काव्य हे भावमधुर आहे. त्याला परतत्त्वाचा स्पर्श लाभल्यामुळे त्याची झळाळी अधिकच वाढली आहे. एका अडाणी, सामान्य स्त्रीने केलेली ही काव्यरचना मध्ययुगीन मराठी वाङ्मयात आपल्या वेगळेपणाने उठून दिसणारी आहे. मराठी वाङ्मयाच्या वैभवात भर घालणारी आहे, यात शंका नाही.

## ३.५ शब्दार्थ व टिपा

- **संग** – संगत
- **अग्रगणी** – श्रेष्ठ
- **गज** – हत्ती
- **अली** – भ्रमर
- **नश्वर** – नाशिवंत
- **गणिका** – वेश्या, कलावंतीण
- **भलतैसा** – कसलातरी किंवा सामान्य
- **मृग** – हरीण
- **केणे** – माल, जिन्नस
- **भिवरा** – चंद्रभागा
- **अहं** – मी म्हणजे देह
- **दासी** – सेविका किंवा शिष्या

## ३.६ प्रश्न व उत्तरे

### १. योग्य पर्याय निवडा

१. संत नामदेवांच्या घरची दासी असा उल्लेख कोणाचा केला जातो?

अ) संत मुक्ताबाई ब) संत जनाबाई क) संत कान्होपात्रा ड) संत वेणाबाई

२. संत जनाबाईने संत चोखामेळा यांचा उल्लेख कोणत्या शब्दाने केला आहे?

अ) भक्त ब) वैष्णव क) अभक्त ड) अस्पृश्य

३. सर्व संतांमध्ये अग्रगणी म्हणूत संत जनाबाई कोणाचा उल्लेख करते?

अ) संत निवृत्तिनाथ ब) संत नामदेव क) संत ज्ञानदेव ड) संत कान्होपात्रा

४. कशाची संगत घातक आहे, असे जनाबाईंना वाटते?

अ) सज्जनांची ब) विषयांची क) भक्तीची ड) नामस्मरणाची

५. जनाबाईने पंढरीला कशाची पेठ म्हटले आहे?

अ) सज्जनांची ब) विवेकाची क) संतांची ड) परमार्थाची

**उत्तरे –** १. संत जनाबाई, २. वैष्णव, ३. संत ज्ञानदेव, ४. विषयांची, ५. विवेकाची

**२. दीर्घोत्तरी प्रश्न**

■ संत जनाबाईने संतसंगती आणि नामस्मरण यांचे महत्त्व कसे पटवून दिले आहे, ते सांगा.

**प्रास्ताविक :** नामदेवांच्या घरची दासी जनी .... तिच्या अभंगवाणीचा थोडक्यात परिचय. ईश्वरभक्ती, संत महिमा, विठ्ठल महिमा, उपदेशपर रचना, कथात्मक रचना अशी जनाबाईंच्या अभंगांमध्ये विविधता आढळते.

**विवेचन :** भक्ती हे सर्वांसाठी सुलभ साधन. येथे जात-पात-वर्ण यांची आडकाठी येत नाही. संसारात रहून नामस्मरणभक्तीने परमेश्वराची प्राप्ती करून घेता येते.

सुखे संसार करावा। माजी विठ्ठल आठवावा संतांचा तो संग नव्हे भलतैसा

नामाच्या सामर्थ्याने भवसागर तरून जाता येते नाम विठोबाचे घ्यावे, करू हरीचे कीर्तन

इत्यादी मुद्दे घेऊन विवेचन करता येईल.

**समारोप :** संत जनाबाईंच्या अभंगांतून तत्कालीन काळातील नामभक्ती, संतसंगती यांना उजाळा दिला आहे. जनाबाईंच्या अभंगांतून आपणास याची पुरेपुर प्रचिती येते. तिच्या अभंगातील माधुर्य यामुळे अधिकच वाढते.

**३. लघुत्तरी प्रश्न**

■ विषयांची संगत घातक असते, हे जनाबाईंनी कसे स्पष्ट केले आहे?

हरीण, पतंग, मासा, भ्रमर, हत्ती यांचे दृष्टांत देऊन जनाबाईने हे पटवून दिले आहे. विषयांमुळे सुखदुःखाची निर्मिती, त्यात माणूस अडकून पडतो. विषयांच्या संगतीने अनेक अधोगतीला गेले आहेत. १) पतंग सुखावला भारी, २) चोरा संगतीने गेला इत्यादी अभंगांच्या अनुषंगाने चर्चा करता येईल.

## ३.७ सरावासाठी प्रश्न

**१. योग्य पर्याय निवडा.**

१. हरघडी प्रत्येक कामात संत जनाबाईला कोण मदत करतो?

अ) संत ज्ञानदेव ब) संत नामदेव क) श्रीविठ्ठल ड) संत चोखामेळा

२. ‘स्त्रीजन्म म्हणवुनी न व्हावे उदास’ असे कोणाचे मत आहे?

अ) संत ज्ञानदेव ब) संत नामदेव क) संत जनाबाई ड) संत कान्होपात्रा

३. चोर आणि पतंग यांच्या दृष्टांतांतून जनाबाईंने कशावर प्रकाश टाकला आहे?

अ) संतसंगत ब) विषयांची संगत क) भक्ती ड) नामस्मरण

४. संत जनाबाईंने जीवाला कशाची उपमा दिली आहे?

अ) जहाज ब) दीप क) सज्जन ड) आत्मा

५. शरीर कशापासून बनले आहे?

अ) प्रकृती–पुरुष ब) पंचमहाभूते क) अन्नपदार्थ ड) खनिज

**२. दीर्घोत्तरी प्रश्न**

१. संत जनाबाईंच्या उपदेशाचे स्वरूप स्पष्ट करा.

२. ‘जनाबाईंची कविता ही श्रेष्ठ तत्त्वकविता आणि भावकविता आहे’ या विधानाची चर्चा करा.

**३. लघुत्तरी प्रश्न**

१. संत जनाबाईंने वर्णन केलेले पंढरीमाहात्म्य आणि विठ्ठलमाहात्म्य थोडक्यात सांगा.

२. ‘स्त्रीजन्म म्हणवूनी न व्हावे उदास’ असे जनाबाई का म्हणते?

३. ‘संत जनाबाईंनी वर्णन केलेल्या भक्तीचे स्वरूप स्पष्ट करा.

## ३.८ अधिक वाचन

१. ‘महाद्वाराच्या पायरीशी’ (सं.) हेमंत इनामदार, ल. रा. नसिराबादकर

२. जनाबाईंचे निवडक अभंग : डॉ. सुहासिनी इर्लेकर

३. संत जनाबाई : चरित्र व काव्य (सं.) चिटणीस व कार्यकारिणी, श्रीसंत जनाबाई शिक्षण संस्था, गंगाखेड) अनमोल प्रकाशन, पुणे १९७६.

## ३.९ उपक्रम

गंगाखेड, पंढरपूर या धार्मिक स्थळांना भेट देऊन संत जनाबाईंच्या चरित्राविषयी अधिक माहिती मिळविण्याचा प्रयत्न करा.

❑❑❑